# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२ प्रस्ताव क्रमांक : ०३ दिनांक:- ०८/०८/२०२२**

---------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे प्रसुतीसाठी दाखल झालेली पेशंट नामे अरुंधती कृष्णाचंद्र बिश्वास रा.बोल्हेगांव,संभाजी नगर अहमदनगर या महिलेचा प्रसुती प्रश्चात मृत्यू झाल्याने तिच्या वारसास आर्थिक मदत देणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

उपरोक्त विषयानुसार रिपोर्ट देण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे अरुंधती कृष्णाचंद्र बिश्वास रा.बोल्हेगांव, संभाजीनगर, अहमदनगर ही महिला दिनांक 06 नोव्हेंबर 2021 रोजी बाळंतपणाकरीता दाखल झाली. त्यांच्यावर दिनांक 08 नोव्हेंबर 2021 रोजी सकाळी 10.20 वाजता सिझेरीयन शस्त्रक्रीया करण्यात आली. तदनंतर 2.45 वाजता सदर महिलेची प्रकृती बिघडल्याने तिला पुढील उपचाराकरीता विखे हॉस्पीटल येथे संदर्भीत करण्यात आली. तथापि सदर महिलेचा मृत्यू संदर्भीत होतांना विखे हॉस्पीटल येथे झालेला आहे.

याबाबत दिनांक 10 नोव्हेंबर 2021 मा.आमदार श्री.संग्रामभैय्या जगताप, मा.महापौर सौ.रोहिणीताई शेंडगे, मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले, मा.सभापती सौ.पुष्पाताई बोरुडे, मा.उपसभापती सौ.मीनाताई चोपडा, महिला व बाल कल्याण समिती, मा.डॉ.श्री.सागर बोरुडे अध्यक्ष, आरोग्य समिती मा.आयुक्त साहेब यांनी भेट देवून सदर प्रकरणी सदर रुग्णाच्या मृत्यूची बाबी तपासणीकामी व प्रशासनात पुढील दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सुचविणेकामी उच्च स्तरीय चार सदस्यांची चौकशी समिती नियुक्त केलेली आहे.

तसेच सदर महिलेच्या प्रसुती पश्चात झालेल्या मृत्यू बाबत तिच्या वारसास सामाजिक व सहानुभूती जाणीवेतून आर्थिक मदत देणेबाबत मा.आयुक्त यांनी निर्देशीत केलेले आहे.

यापुर्वी संदर्भीय मा.महासभेच्या दिनांक 14 सप्टेंबर 2017 च्या पारीत ठरावानुसार श्रावणी निकम या महिलेचा कै.बा.दे.दवाखाना येथे बाळातपणामध्ये गुंतागुंत होवून मृत्यू झालेबाबत तिच्या वारसास रु.1 लक्ष सहानुभूतीपुर्वक नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. अशा प्रकारच्या घटनेबाबत व त्यासाठी आर्थिक मदत देणेकामी सन 2021-2022 या आर्थिक वर्षात बाळांतपणामध्ये गुंतागुंत निर्माण झाल्यास नुकसान भरपाई (कै.बाळासाहेब

देशपांडे दवाखाना) या लेखाशिर्षामध्ये रु.05 लक्ष इतकी आर्थिक तरतुद करण्यांत आलेली आहे.

तरी अरुंधती कृष्णाचंद्र बिश्वास रा.बोल्हेगांव, संभाजीनगर, अहमदनगर या महिलेचा प्रसुती पश्चात मृत्युमुळे तिच्या वारसास रु. 1 लक्ष आर्थिक मदत करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव व अकौंट विभागास आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्र.वैद्यकीय अधिकारी यांचा अभिप्राय कि, प्रस्तावित अ प्रमाणे बजेट तरतुदीनुसार कॅ.बा.देशपांडे दवाख़ाना मधील उपचारा दरम्यान गुंतागुंत होउन रुग्ण महिलेचा मृत्यु झाल्यास आर्थिक मदत 1 लाख़ रुपये देणेस प्रस्ताव मान्यतेस तथापी आदेशार्थ सादर. .

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि, मुख्य लेखाधिकारी यांची स्वाक्षरी घेणेस अधिकाराहुन प्रस्तावात नमुद केलेनुसार बाळंतपणात गुंतागुंत निमित्त होउन महिलेचा मृत्यु झाल्याने त्याचा वारसास 1 लक्ष आर्थिक मदत देणेबाबत नमुद केले असल्याने सदरची बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने मा.महासभा मंजुरी घेणे उचीत राहील.मुळ फाइल नाही तसेच चॉकशी समितीच्या अहवालानुसार कार्यवाही करणे उचित राहील.

यावर मुख्यलेख़ाधिकारी यांची स्वाक्षरी असे.

यावर उपायुक्त(कर) यांचा अभिप्राय कि, प्रस्तावित अ प्रमाणे मान्यतेस मुलेप ची पुर्तता फेर सादर करणे.

मा.फेरसादर ,

यावर प्र.मुख्यलिपिक यांचा अभिप्राय की, मुलेप यांच्या आक्षेपानुसार चॉकशी अहवाल सोबत जोडलेला आहे. मान्यतेस्तव सविनय सादर.

चॉकशी अहवाल ही बाब प्रशासकीय बाब आहे आर्थिक मदत देणेस व प्रस्तावित करणे शिफारस आहे. तथापि मंनपा लेख़ाशीर्षक मंज़ुर असल्याने G.B. पुढे विषय घेणे उचीत नाही. प्रशासकीय मान्यतेस सादर.

यावर मा. आयुक्त यांचा अभिप्राय कि, मा. महासभेच्या मान्यतेसाठी सादर.

**चर्चा :**

**मा.स्थायी समिती सभापती कुमार वाकळे** : एक तान्हे मुल त्यांना आहे. महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त मदत त्या महिलेला दिली पाहीजे. ते परप्रांतीय आहेत. त्यांची परिस्थीती अत्यंत वाईट आहे. चुकी कोणाची हे सांगता येत नाही. महानगर पालिकेच्या वतीने एक चांगला मेसेज जाईल. आताच त्यांनी घरासाठी लोन घेतेले. पण आता त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे त्यांना मदत होईल.

**डॉ.राजुरकर:-** बजेट तरतुद 5 लाख रुपये आहे. 2017 ला एक लक्ष दिले होते. एक लक्ष प्रस्तावित केले आहे.

**मा. आयुक्त साहेब**: उद्याच देवू.

**मा. रविंद्र बारस्कर :** आठ दिवसापुर्वी सावेडी गावात एका कुटुंबियांच्या मुलीला कुत्र्याने चावा घेतला शहरात कुत्र्यांचे टोळके निर्माण झाले आहे.

**मा. गणेश कवडे :-** हा महत्वाचा प्रश्न आहे. हे काम करणारी संस्था दुर्लक्षपणे काम करत आहे.ते लोक फोन उचलत नाही. सभागृहाला विनंती आहे त्यांचे बील काढू नका बील थांबवा.

**मा. परसराम गायकवाड :-** कायनेटीक चौकात अशीच घटना घडली हंस यांना फोन केला पण त्यांनी गाडी पाठविली नाही.

**मा. शाम नळकांडे**:- आतापर्यत आपण केलेली कागदावर नोंदवलेली कारवाई सांगा.

**डॉ. बोरगे** : निर्बीजीकरणासाठी पिंपळगावला सेंटर चालू केले आहे.

**मा. शाम नळकांडे**:- फक्त कान कापले जातात.

**मा. आसीफ सुलतान**:- सदर टेंडर रद्द करा नवीन टेंडर काढा.

**मा. शाम नळकांडे**:- अमरधाम मधील एका प्रेताचा हात व एक अवयव कुत्र्याने बाहेर काढले होते तेव्हा त्या ठीकाणी एक वॉचमन ठेवला.

**मा. अनिल शिंदे:** ठेकेदाराला कार्यान्वीत आदेश कधी दिला? पिंपळगाव माळवी येथील आतापर्यंत बिलं किती अदा केले?

**MOH** : ८-९ महिन्यापासुन काम करतो. आठशे वर कुत्र्यांचे निर्बिजीकरण झाले आहे.

**मोरे (CAFO):-** २९ एप्रिल २०२२ रोजी महानगरपालिकेमध्ये रुजु झालो.पिपल्स फॉर अँनिमलचे आठ महिन्याचे काम झाले तर जवळपास पाच लाख बील अदा केले.

**मा. अनिल शिंदे :-** कमीत कमी 2 वर्षे झाले आहेत त्याला काम देउन कित्येक घटना झालेल्या आहेत. हे बोगस बील आहेत असा माझा आरोप आहे. चुकीचे बील काढले जातात.आयुक्त यांनी गांभीर्याने विचार करा. लेआउटच्या फाईल डायरेक़्ट तुम्ही सही करु नका.मध्ये कोणाची तरी सही ठेवा. आर्थिक वर्ष संपल्यानंतर आर्थिक वर्षातच खर्च झाला पाहीजे. मागील वर्षाचे कामं या वर्षात खतविली जातात. तुम्ही तसे आदेश द्या. निर्बीजीकरणाचे बील अदा किती झाले ते कंन्फर्म सांगु शकत नाही. भाळवणीला कुत्रे सोडले जातात. ज्या ठिकाणी केंद्र आहे त्या ठिकाणी जायला पाहीजे पण तसे होत नाही. यावर नियंत्रण ठेवा. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना संदर्भात विषय झाला. अमृत भुयारी गटार योजना पूर्ण झाली का?

**मा.शहर अभियंता श्री.इथापे:-** सन 18 मध्ये कार्यारंभ आदेश दिला. दोन वर्ष कोरोना मध्ये कामं संथ गतीने चालु होती.

**मा. अनिल शिंदे :-** जिथे रस्ते खोदले ते सुस्थितीत त्याने दुरुस्त करायला पाहीजे.

**मा.शहर अभियंता श्री.इथापे :-** आतापर्यंत रिस्टोरेशनचे कोणतेही बील दिलेले नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** मा.महापौर मॅडम सदर गरीब महिलेच्या वारसांना जास्तीत जास्त मदत द्या. बाळाच्या नांवावर एफ.डी. करा.

**मा.महापौर मॅँडम**: एक लाख बाळाच्या नावावर FD करण्यात येईल व 2 लाख कुटुंबाला देवू.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे प्रसुतीसाठी दाखल झालेली पेशंट नामे अरुंधती कृष्णाचंद्र बिश्वास रा.बोल्हेगांव, संभाजी नगर, अहमदनगर या महिलेचा प्रसुती पश्चात मृत्यू झाल्याने तिच्या वारसास रक्कम रुपये 3 लाख आर्थिक मदत देणेस की सभा मान्यता देत आहे. या रक्कमेपैकी मृत महिलेच्या वारसास दोन लक्ष रुपयांची आर्थिक मदत देणे व तिच्या लहान बाळाच्या नांवे रक्कम रुपये 1 लाखाची एफ.डी. करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

प्रशासनाने नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.कुमार बबन वाकळे,

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२**   **प्रस्ताव क्रमांक : ०४**   **दिनांक:- ०८/०८/२०२२**

---------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** डॉ.नांगरे भाउसाहेब बन्सी यांचे सन 2017 चे थकीत मानधन देयक मा.महासभेपुढे ठेवणेबाबत.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ :- 1) जा.क्र.आरोग्य विभाग 320 दि.19‍६-2017 रोजीचे मुदतवाढ आदेश.

2) शिवराम बंन्सी नांगरे यांचा दि.08-03-2021 रोजीचा अर्ज.

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,संदर्भ क्र.1 अंन्वये अहमदनगर महानगरपालिका,क़ॉडवाडा विभागाकडे डॉ. श्री. भाउसाहेब बंंसी नांगरे यांनी मनपा हद्दीतील उनाड, मोकाट जनावरे बंदोबस्त करणेकरीता व्हेटरनरी डॉक्टर म्हणुन मानधनावर काम केलेले होते. सदर कामाचे कार्यारंभ आदेश व मुदतवाढ आदेश डॉ. श्री. भाउसाहेब बंन्सी नांगरे, गहिनीनाथ प्रतिष्ठाण पाथर्डी या संस्थेच्या नावे देण्यात आलेले आहेत.कार्यारभ आदेशांवये रु.24,500/- प्रति माह याप्रमाणे सेवा करार पध्दतीने काम केलाचे निदर्शनास येते.

तसेच संदर्भ क्र. 2 अंवये डॉ. श्री. शिवराम बंन्सी नांगरे यांनी मानधन मिळणेबाबत केलेल्या विनंती अर्जाचा अनुषंगाने उपरोक्त कालावधीमधील मानधन अदा करणेकामी मूळ नस्तीचा शोध घेतला असता नस्ती गहाळ असल्याचे निदर्शनास येते तथापि, कार्यालयीन अभिलेख व त्यांनी नोंदवहीत केलेल्या स्वाक्षरीनुसार खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार,

| अ.क्र. | कालावधी | एकूण | |
|---|---|---|---|
| 1 | दिनांक 19 जुन 2017 ते दिनांक 30 जुन 2017 | 10 दिवस | रु.8160/- |
| 2 | माहे 1 जुलै 2017 ते दिनांक 30 जुलै | 23 दिवस | रु.18,177/- |
| 3 | दिनांक 01 ऑगष्ट 2017 ते दिनांक 31 ऑगष्ट 2017 | 25 दिवस | रु.19,758/- |
| 4 | दिनांक 01 सप्टेंबर 2017 ते 30 सप्टेंबर 2017 | 24 दिवस | रु.19,600/- |
| | | एकुण | रु.65,695/- |

तरी उपरोक्त कार्यालयीन अभिलेख व डॉ.श्री.भाऊसाहेब बन्सी नांगरे, यांच्या नोंदवहीत केलेल्या स्वाक्षरी नुसार डॉ.श्री.भाऊसाहेब बन्सी नांगरे, गहिनीनाथ प्रतिष्ठाण पाथर्डी यांचे एकुण रु.65,695/-(अक्षरी पासष्ट हजार सहाशे पंचानव फक्त ) इतके मानधन लेखा विभागामार्फत डॉ.श्री.भाऊसाहेब बन्सी नांगरे, गहिनीनाथ प्रतिष्ठाण पाथर्डी यांचे नावे अदा करणेस प्रस्ताव मंजुरिस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा. उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मुलेप /मुलेअ यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मा. महासभेपुढे विषय मंजुरीस्तव घेणे मान्यतेस्तव सादर.

यावर फेरसादर रिपोर्ट की,

संदर्भ :- 1) जा.क्र.आरोग्य विभाग 320 दि.19-6-2017 रोजीचे मुदतवाढ आदेश.

2) शिवराम बंन्सी नांगरे यांचा दि.08-03-2021 रोजीचा अर्ज.

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,संदर्भ क्र.1 अंन्वये अहमदनगर महानगरपालिका,क्रॉडवाडा विभागाकडे डॉ. श्री. भाऊसाहेब बंंसी नांगरे यांनी मनपा हद्दीतील उनाड, मोकाट जनावरे बंदोबस्त करणेकरीता व्हेटरनरी डॉक्टर म्हणुन मानधनावर काम केलेले होते. सदर कामाचे कार्यारंभ आदेश व मुदतवाढ आदेश डॉ. श्री. भाऊसाहेब बंंसी नांगरे, गहिनीनाथ प्रतिष्ठाण पाथर्डी या संस्थेच्या नावे देण्यात आलेले आहेत.कार्यारभ आदेशांन्वये रु.24,500/- प्रति माह याप्रमाणे सेवा करार पध्दतीने काम केलाचे निदर्शनास येते.

तसेच संदर्भ क्र. 2 अंवये डॉ. श्री. शिवराम बंंसी नांगरे यांनी मानधन मिळणेबाबत केलेल्या विनंती अर्जाचा अनुषंगाने एकण 65695/- (अक्षरी रक्कम रुपये पासष्ट हजार सहाशे पंच्च्यान्नव मात्र) अदा करणेकामी मा.मुख्य लेखापरीक्षक यांनी सदर मानधन हे सन 2017-2018 मधील असल्याने मा.महासभेची मंजुरी आवश्यक असले बाबतचे सुचित केलेले आहे.

मा.मुख्यलेखापरीक्षक यांनी सुचित केले नुसार सदरचे थकीत मानधन देयके मा.महासभेची मंजूरी पश्चात अदा करणे उचीत वाटते तथापी पुढील आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 मधील नियम 168 नुसार मुदतबाह्य मागणी मा.महासभा मंजूरीशिवाय देता येणार नाही.

यावर मा. उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर, जीबी समोर ठेवणे साठी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

**मा.श्री.शाम नळकांडे:-** विषय मंजुर करा.

**मा. महापौर म[illegible]म :-** ऑफिस रिपोर्ट मंजुर

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजुर. डॉ.नांगरे भाउसाहेब बन्सी यांचे सन 2017 चे थकीत मानधन देयक अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.शाम किसन नळकांडे

अनुमोदक : मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२ प्रस्ताव क्रमांक : ०५ दिनांक:- ०८/०८/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** निविदाकार यांनी भरलेली निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कम परत देणेस मंजूरी मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :-**एस एस एंटरप्रायजेस,नाशिक यांचा दिनांक 03 मे, 2021 रोजीचा विनंती अर्ज.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की, उपरोक्त संदर्भीय पुरवठादार श्री.एस.एस.एंटरप्रायजेस,नाशिक यांनी अहमदनगर महानगरपालिकेस आवश्यक असणारे 10 सीटचे फिरते शौचालय वफायबर बाक्स पुरवठा निविदा दाखल केल्या होत्या व त्या अनुषंगाने निविदा अनामत (सिक्युरीटी डिपॉझिट) रक्कमा भरलेल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | निविदा डिपॉझिट रक्कमेचा तपशिल | सा.पा.क्र. व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | एस एस एंटरप्रायजेस, नाशिक | अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी 10 सीटचे फिरते शौचालय-१ नग पुरवठा ई-निविदा | FI०४/६३९० ०३/०८/२०१६ | १४,५००/- |
| | | अहमदनगर महानगरपालिका फायबर बाक्स-151 नग पुरवठा ई -निविदा | FI०४/१२२७ १३/१०/२०१६ | ३२,०००/- FDR No. ०४४६१३० दि०७/१०/१६ |
| | | अहमदनगर महानगरपालिका घनकचराअ व्यवस्थापन विभागासाठी 10 सीटरचे फिरते शॉचालय ‍ 1 नग पुरवठा. | FI०४/२१५८ २४/०५/२०१७ | १४,५००/- FDR No. ४९१७४७ दि.२४/०५/१७ |

अर्जदार यांनी भरलेली निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कम परत मिळणेबाबत संदर्भिय अर्जांवये मागणी केलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम क्रमांक 190(3) अन्वये तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यत मागणी न केलेल्या सर्व शिलकी रक्कमा प्रत्येक वर्षा अखेर महानगरपालिकेकडे व्यपगत होतात. उपरोक्त निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट)

रक्कम भरुन तीन वर्षापेक्षा जादा कालावधी झालेला आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम क्रमांक 190(3) अन्वये सदर निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कमा परत देणेकरिता मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी महानगरपालिकेत व्यपगत झालेल्या उपरोक्त अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कमा निविदाकार एस. एस, एंटरप्रायझेस, नाशीक यांना परत करणेस मा. महासभेची मंजुरी मिळणेस सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव सविनय सादर .

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, स्टोअर विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे मा.महासभेच्या मंजुरीस्तव कार्यवाहीस सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत प्रमाणॆ आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ प्रमाणॆ मान्यतेसाठी.

यावर अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्क्षक सहमती असे.

**चर्चा :**

**मा.श्री.शाम नळकांडे:-** विषय मंजुर करा.

**मा. महापौर महोदय :-** ऑफिस रिपोर्ट मंजुर.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. निविदाकार यांनी भरलेली निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कम अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

श्री.एस.बी.भोर, सह्याद्री मजूर सह.संस्था, श्री.राजेंद्र विठ्ठल जाधव, ओम साईकंन्स्ट्रक्शन, सातीसाकळाई मजूर सह.संस्था, नक्षत्र इलेक्ट्रीक मजूर सह संस्था, नम्रता मजूर सह.संस्था, नंदनवन मजूर संस्था, जयश्रीराम मजूर संस्था, राजीव मजूर संस्था, विनायक मजूर संस्था, बालाजी फर्निचर मजूर संस्था, सुयश मजूर संस्था, किर्ती मजूर संस्था, मुंजोबा मजूर संस्था, शुक्लेश्वर मजूर संस्था, अंबिका मजूर संस्था, श्रीनिवास मजूर संस्था, शिवप्रसाद मजूर सह.संस्था मर्या., मे.रमाविजया इलेक्ट्रीकल्स, मे.शोभना इलेक्ट्रीकल्स, उरमुडे इलेक्ट्रोमेट इंडस्ट्रीज, मे.साईबाबा इलेक्ट्रीकल्स पे.सी.मजूर संस्था, गणेश सप्लायर्स, मे.अण्णाभाउ साठे मजूर सह संस्था, आनंद दत्तात्रय पुंड, राजेंद्र लक्ष्मण लोणकर, श्री.ए.सी.कोठारी, एस.एस.एन्टरप्रायजेस, नरसिंह मजूर सह.संस्था, श्री.ए.झेड. कोठारी मे.ए.पी.सोनी मंडलेचा, श्री.सुनिल रामराव राउत, श्री.बी.जी.गोसावी, मे.आर.आर.कपूर, मे.जय मुंजोबा लाईट हाउस,मॉ शेरावाली मजूर सह. संस्था, गुरुप्रसाद इलेक्ट्रीक मजूर सह.संस्था, नवनाथ मजूर सहकारी

संस्था, मथुरा मजूर सहकारी संस्था, रेणुका मजूर सह.संस्था, गुंजाळ कंन्स्ट्रक्शन, न्यू साई फायबर्स, इत्यादी संस्थांची फॉरफीट झालेली अनामत रक्कम अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

श्री.ए.जी.वाबळे, अहमदनगर यांचे नांवे असलेली ई निविदा क्रमांक 1176 प्रभाग क्रमांक 12 मधील प्रेमदान हडको मध्ये सामाजिक सभागृह बांधणे या कामाचे देयक अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

मातोश्री न्युज पेपर यांचे देयक अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

याबाबत प्रशासनाने नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

सिटी सर्व्हे नंबर 74, गुरुप्रसाद सहकारी गृह निर्माण संस्था, आगरकर मळा, अहमदनगर व चाहुराणा बुद्रुक गट क्रमांक व उपविभाग 74/1, 74/2 खुली जागा, वसंत टेकडी, पिण्याचे पाण्याची टाकी जवळ, अहमदनगर तसेच केडगांव गट क्रमांक व उपविभाग 61/1/1 खुली जागा, दिनुभाउ कुलकर्णी जॉगींग ट्रक्र, प्रोफेसर कॉलनी, सावेडी तसेच लेखानगर सर्व्हे नंबर 47/4 अ, जुना पिंपळगांव माळवी रोड, सावेडी, अहमदनगर या प्रभागातील नागरिकांना व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये ओपन जीम, व्यायाम साहित्य जिल्हा क्रीडा कार्यालय अहमदनगर यांचे मार्फत बसविणे व मैदाने विकसीत करणेकरीता मान्यता देण्यांत येत आहे.

शहरातील नागरिकांना जन्म-मृत्यूचे दाखले व विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळणेकामी व प्रलंबित अर्जांचा जलद गतीने निपटारा होण्यासाठी प्रभाग निहाय 1) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रमांक 1 सावेडी, 2) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रमांक 2 शहर, 3) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रमांक 3 झेंडीगेट, 4) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रमांक 4 बुरुडगांव यांची जन्म-मृत्यूचे दाखले व विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणेकामी उपनिबंधक म्हणुन नेमणूक करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.शाम किसन नळकांडे,
अनुमोदक : मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२ प्रस्ताव क्रमांक : ०६ दिनांक:- ०८/०८/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरातील प्रभाग क्रमांक 10 मधील रामवाडी येथील तारकपुर शांतीपूर ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत नविन झालेल्या डीपी रस्त्याला **"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे"** असे नामकरण नांव देणे बाबत

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1) मा.आमदार श्री.संग्रामभैय्या अरुणकाका जगताप यांचे जा.क्र.2280/4/22 दिनांक 25/05/2022 रोजीचे पत्र.

2)मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडलिक भोसले यांचे जा.क्र.185 दिनांक 27/05/2022 रोजीचे पत्र.

3) मा.सभापती,स्थायी समिती श्री.कुमार बबनराव वाकळे यांचे जा.क्र.15 दिनांक 30/05/2022 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, अहमदनगर शहरातील प्रभाग क्रमांक 10 मधील रामवाडी येथील तारकपुर शांतीपुर ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत नविन झालेल्या डीपी रस्त्याला **"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे"** असे नांव देणे बाबत मा.आमदार श्री.संग्रामभैय्या अरुणकाका जगताप यांनी दिनांक 25/05/2022 रोजी संदर्भीयस पत्र देवून सुचविले आहे.

सदर डीपी रस्ता रामवाडी भागामध्ये असुन तारकपूर समोरील शांतीपूर ते रामवाडी भागातील एस.टी. वर्कशॉप पर्यंत आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे यांचे सामाजिक व साहित्य क्षेत्रात अतुलनीय अशी कामगीरी आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे यांचे स्मरण त्यांचा कार्याची प्रेरणा सातत्याने मिळावी या उद्देशाने अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुर ते रामवाडी अंतर्गत जाणा-या मार्गास साहित्यरत्न लोकशाही अण्णाभाउ साठे यांचे नामकरण व्हावे अशी मागणी नागरीकांकडून होत आहे. त्यामुळे सदर विषय हा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत चर्चेसाठी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तरी तारकपुर ते रामवाडी अंतर्गत जाणा-या मार्गास **"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे"** असे नामकरण बाबत उचित कार्यवाही करणेबाबत संदर्भीय पत्र क्रमांक 1 ते 3 मध्ये म्हटलेले आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास,इमारतीस भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाअन्वये मा.महासभेस आहे. सदर रस्त्यास यापुर्वी कोणतेही नाव देण्यात आलेले नाही.

तरी अहमदनगर शहरातील प्रभाग क्रमांक 10 मधील रामवाडी येथील तारकपुर शांतीपुर ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत नविन झालेल्या डीपी रस्त्याला **"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे"** असे नामकरण नांव देणे बाबत मा.नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवून प्रस्ताव मा.महासभेकडे

निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर सहाय्यक संचालक, नगररचना यांचा दिनांक 16 जुन, 2022 रोजीचा अभिप्राय की, विषयांकित रामवाडी येथील 12.00 मी. रुंद रस्त्यास नांव देणे बाबत प्रस्ताव मा.महासभेसमोर निर्णयासाठी सादर करणेस हरकत नाही.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ व ब नुसार कार्यवाही होणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**---*---**

**चर्चा :**

**मा.स्थायी समिती सभापती कुमार वाकळे** : अहमदनगर शहरातील प्रभाग क्रमांक 10 मधील रामवाडी येथील तारकपुर शांतीपूर ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत नविन झालेल्या डीपी रस्त्याला **"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे"** असे नामकरण नांव देणे बाबतचा जो विषय आहे यासाठी मा. उपमहपौर, मा. आमदार या रस्तासाठी आग्रही होते. आण्णा भाउंचे काम फक्त मातंग समाजासाठी नाही तर कष्टकरी कर्मचा-यांचे कल्याण आण्णाभाउंनी केले होते. या रस्त्याला आण्णाभाउंचे नाव द्यावे ही विनंती करतो.

**मा. रविंद्र बारस्कर** : मी याला अनुमोदन देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर शहरातील प्रभाग क्रमांक 10 मधील रामवाडी येथील तारकपुर शांतीपूर ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत नविन झालेल्या डीपी रस्त्याला **"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे"** असे नामकरण नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले,

अनुमोदक : मा.श्री.कुमार बबन वाकळे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२** **प्रस्ताव क्रमांक : ०७** **दिनांक:- ०८/०८/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानातुन शिल्लक असलेले अनुदान खर्च करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1) शासन निर्णय क्र.अशस 2021/प्र.क्र.199 नवि-20 दिनांक 01 01 2011

2) अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभाग जा.क्र.176 दिनांक 23 07 2019 चे तांत्रिक मान्यता मिळणे बाबत मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेला प्रस्ताव.

3) क्र.मअसे/37-ए/2020/194 दिनांक 10 फेब्रुवारी 2020 चे तांत्रिक मंजूरीचा ईमेल संदेश.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये विनंती प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणे करीता अग्निशमन सेवेशी निगडीत पायाभुत सुविधांचे बळकटी करण करणेसाठी शासन निर्णयाव्दरे सदर अग्नसुरक्षा अभियाना मध्ये सहभागी झालेली असुन सदर अभियाना अंतर्गत महानगरपालिकेने दि.01 01 2010 पासून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना 2006 अन्वयेचे कलम 25 अन्वये विहीत केलेला अग्निसुरक्षा निधी स्थापन करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक उपाययोजना 2006 अन्वयेचे कलम 25 अन्वये विहीत केलेला अग्निसुरक्षा निधी अंतर्गत मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका जा.क्र.642 दि.04 03 2020 अन्वये मा.जिल्हाधिकारी साहेब अहमदनगर यांचेकडेस रु.1 कोटी 40 लक्ष इतक्या निधीची मागणी केलेली होती.

सदर मागणीच्या अनुषंगाने अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणे करीता अग्निशमन सेवेशी निगडीत पायाभुत सुविधांचे बळकटीकरण करणेसाठी महानगरपालिकेस रु.61,20,000/- इतका निधी धनादेश क्र.000347 दि.30-03-2020 अन्वये चा निधी मनपा फंड सांकेतांक क्र.4332900716 या संकेतावर पावती क्र.524 दि.04 06 2020 रोजी जमा झालेला आहे. सदर रु.61,20,000/- या निधी मधुन GM पोर्टलवर प्रक्रीया राबवून रु.48,74,158/- इतका निधी खर्च केलेला असून रु.12,45,852/- इतका निधी शिल्लक आहे.

सदर शिल्लक निधी मधून अग्निशमन विभागाकडेस पोर्टेबल पंप आवश्यक असल्याने (सबमर्शिबल) दोन नग अंदाजे रक्कम रु.12.00 लक्ष इतका खच्र अपेक्षित असून सदरचा खर्च

शिल्लक निधीमधून करणेस मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती कडे रु.12,45,852/- चा प्रस्ताव सादर केला असता मा.महासभेची मंजुरी घेवून प्रस्ताव सादर करणे बाबत समक्ष चर्चेव्दारे कळविलेले आहे.

सबब सदर शिल्लक निधीमधून अग्निशमन विभागाकडेस पोर्टेबल पंप आवश्यक असल्याने (सबमर्शिबल) दोन नग अंदाजे रक्कम रु.12.00 लक्ष इतका खर्च अपेक्षीत असून सदरचा खर्च शिल्लक निधीमधून करणेस मा.महासभेमध्ये घेणेकामी प्रस्ताव सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**---*---**

चर्चा :

**मा. शाम नळकांडे :** कल्याण रोड, वारुळाचा मारुती परिसरात पुर परिस्थीतीची व्हिजीट केली. आपत्कालीन परिस्थीतीत आपली टिम काय काम करते. साधन सामग्री काय आहे? काय उपाययोजना करतात?

**मिसाळ :** आपत्कालीन विभाग कार्यरत आहे. अग्निशमन विभाग कार्यालय येथे हा विभाग कार्यरत आहे. लाईफ जँकेट आहे. आपत्कालीन पुस्तीका तयार केले आहे. अग्नीशमन विभागात व प्रभाग अधिकारी यांचेकडे ज्या ज्या तक्रारी आल्या त्याठिकाणी आधी पोहोचलो. 6 पंप आहेत. 5 चालू आहेत.काल परवा तात्काळ दुरुस्त करुन घेतले. कल्याण रोड वाहतुकीसाठी पुर्ण बंद होता. त्याठिकाणी बँरेकेटींग का नाही लावले. वारुळचा मारुती पुलाला बँरेकेटींग नाही लावले.तुमच्याकडे तक्रार प्राप्त झाली नाही तोपर्यंत कारवाई करायची नाही का? आयुक्त साहेब आले त्यावेळी तिथे कोणी ही उपस्थीत नव्हते. बँरेकेट्च्या पोलीस प्रशासनाला सुचना दिल्या यापुढे दक्षता घेतली जाईल.

**मा. शाम नळकांडे :** आपत्कालीन साठी किती खर्च झाला?

**मिसाळ :-** प्रभाग अधिकारी यांना ५० हजारांचे खर्चाचे अधिकार दिले आहेत.

**मा. आसिफ सुलतान** : प्रभाग अधिकारी यांनी जे.सी.बी. मागीतले तर तो निधी नाही म्हणतो.

**मा. शाम नळकांडे :** दिशा दर्शक खांब लावण्याची गरज आहे. पोलीस प्रशासनाची मदत घ्या.घटना होण्यापूर्वी काळजी घ्या. घटना होण्याची वाट पाहु नका.आपली आपत्कालीन टीम तयार ठेवा. आगामी 5 दिवसात पावसाचा अंदाज वर्तविला आहे. अग्निशमन विभागात कर्मचारी भरायला सांगतो. 2 वर्ष झाले हा प्रश्न मी सभेत मांडत आहे.

**मिसाळ :** 2- 3 वर्ष झाले टेंडर काढतो कोणी प्रतिसाद देत नाही.

**मा. प्रकाश भागानगरे:** आपले अग्निशमन इतके चांगले आहे की महानगर पालिकेची ऐतिहासिक वास्तु जळाली ती आपण वाचवु शकली नाही. बंब चालु होत नाही म्हणुन बादलीने पाणी टाकत होतो. अग्निशमन विभागाला किती बळी अपेक्षीत आहेत त्यानंतर अग्निशमन दल सक्षम करणार.

**मा. अनिल शिंदे** : शासनाने वेतन वाढ द्यायचे घोषित केले आहे. आस्थापनाने प्रस्ताव सादर केला का?

**अतिरिक्त आयुक्त :**वार्षिक वेतनवाढीचा प्रस्ताव प्रशासनाकडे प्राप्त झालेला आहे.उपायुक्त बाहेर गावी असल्याने मी माझी स्वाक्षरी करुन दिली आहे आता होईल.

**सभापती म.बा.क. समिती :**महिला बाल कल्याण समितीचा निधी 5 % निधी कॅश स्वरुपात नसल्यामुळे मी काम करु शकत नाही. सदस्यांची माझ्याकडे मागणी होते. ओपन जिम, बाकडे बसविणे.महानगर पालिकेकडे 13 शाळा आहेत. इमारती पत्रा शेडमध्ये आहे. काही ठिकाणी लाईट नाही, फॅन नाही, कोणी अधिकारी उपस्थीत रहात नाही, ठेकेदारांची बीले निघत नाही मग त्यामुळे ते कामं करत नाही.

**मा. शाम नळकांडे : -** महिला बाल कल्याण निधी कॅश करण्यात यावा. नगरसेवक निधी कॅश नाही तो रदद् करा मग मी त्यातुन काम करु शकत नाही.

**मा. प्रकाश भागानगरे :** त्यांनी जी मागणी केली ती वस्तुस्थिती आहे.

**मा. आयुक्त साहेब :** महिला बाल कल्याणसाठी एकुण बजेट 25 % निधी राखुन ठेवतो. महानगर पालिकेचे उत्पन्न घरपट्टीचे आहे.31 ऑगस्ट पर्यत शास्ती माफी योजना लागु केली आहे. 2 कोटी करत शास्ती रक्क्म झाली ती काही रक्कम जमा होईल त्यानुसार पुढील नियोजन कोणताही रोख स्वरुपात निधी नसतो. येणारे उत्पन्नातुन 5% राखीव ठेवण्याचा निधी राखुन ठेवुन महिला बाल कल्याणचे प्रस्ताव असतील ते सादर करावे.

**मा. पाऊलबुधे :** नगरसेवक निधीही रोख करा.जसे महिला बाल कल्याण समितीचे रुलींग दिले तसे रुलींग द्या.

**मा. आयुक्त साहेब :** मी तपासुन घेतो. सकरात्मक मार्ग काढतो.

**मा.श्री.शाम नळकांडे :** विषय मंजूर करण्यांत यावा.

**मा.महापौर मॅडम :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*----

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानातुन शिल्लक असलेले अनुदान खर्च करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.शाम किसन नळकांडे,

अनुमोदक : मा.श्री.प्रकाश बाबुराव भागानगरे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२** **प्रस्ताव क्रमांक : ०८** **दिनांक:- ०८/०८/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन कामे करणे व प्रस्तावित कामांकरीता मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ :- १) मा. शासनाकडील शासन निर्णय क्रमांक :-एफ एफ सी २०२०/प्र.क्र.५६/नवि-४, मंत्रालय, मुंबई, दिनांक २८ आक्टोबर २०२० रोजी स्वराज्य संस्था करिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चितीनुसार.

२) मा. शासन निर्णय क्रमांक :एफएफसी -२०२१/ प्र.क्र.७८/ नवि-४, मंत्रालय,मुंबई, दिनांक २२ सप्टेंबर २०२१ रोजीचे शासन निर्णय.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की, 15 व्या वित्त आयोगातुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता घनकचरा व्यवस्थापनासाठी बंधनकारक अनुदानाचा पहिला हप्ता Tied Grants एकुण रक्कम रु. ५,१३,७१,७१६/- प्राप्त झाले होते. त्यानुसार सदर प्राप्त अनुदान खर्च करणेकामी मा. महासभेने सचिव कार्यालय सका.-07 प्रस्ताव क्रमांक 43. दि. 12/01/2022 रोजी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामांकरिता खर्च करणेकामी मान्याता दिलेली आहे.

त्यानंतर संदर्भीय क्र.2 नुसार 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त रक्कमेतुन पिण्याचे पाणी (पावसाच्या पाण्याची साठवण व पुंनर्वापरासह) व घनकचरा व्यवस्थापनासाठी बंधनकारक अनुदानाचा पहिला हप्ता Tied Grants एकुण रक्कम रु. ४,५८,०१,७४७/- निधी प्राप्त झालेले आहे.

मा. शासना कडील शासन निर्णय क्र. एफएफसी 2020/प्र.क्र. 56/नवि-4 मंत्रालय, मुंबई दिनांक 28 आक्टोबर 2020 रोजी स्वराज्य संस्था करिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चीतीनुसार अहमदनगर महानगरपालिकेस 15 व्या वित्त आयोगातुन रक्कम रु. ४,५८,०१,७४७/- प्राप्त झालेले आहे. त्यानुसार सदरील मा. शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे निधी विनियोगाबाबत कार्यपध्दती निश्चीत करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | प्राप्त एकूण अनुदान | विनियोगाबाबत कार्यपध्द्ती | | निधी |
|---|---|---|---|---|
| १ | रु. ४,५८,०१,७४७/- | Tide Grants :- १. Drinking Water (Including rain water harvesting and recycling) (२५%) | | २,२९,००,८७३/- |

| अ. क्र. | प्राप्त एकूण अनुदान | विनियोगाबाबत कार्यपध्द्ती | | निधी |
|---|---|---|---|---|
| | | २. Solid waste managemenat (२५%) | ५०% | |
| | | | एकूण :- | ४,५८,०१,७४७/- |

वरिल प्रमाणे निधी विनियोगाबाबत घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामे पार पाडणेकामी एकुण रक्कम रु.2,29,00,874/- उपलब्ध आहे. त्यानुसार खालील प्रमाणे नियोजन करुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामे करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तपशील | अंदाजित खर्च | आवश्यक निधी |
|---|---|---|---|
| 1 | संपुर्ण शहरातील कचरा संकलन व वाहतुक करणे व कचरा संकलन वाहतुक अंतर्गत येणा-या कामाकरीता, स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत सिटी कॉ-ऑर्डीनेटर यांचे मानधन अदा करणे | दर महा अंदाजे 70 लक्ष खर्च प्रमाणे तीन महिन्या करीता रक्कम रु.2,10,00,000/- | रक्कम रु.1,78,96,874/- |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालय क्र.1,2,3 व 4 मधील पावसाळया पुर्वीचे बाह्ययंत्रणेमार्फत नाले सफाई व इतर कामे करणे. | दोन महिन्याकरीता अंदाजे खर्च रक्कम रु.50,04,000/- | रक्कम रु.50,04,000/- |
| एकुण | | | रक्कमरु.2,29,00,874/- |

वरिल प्रमाणे 01 ते 02 मुद्दे कामांकरीता निधी लागणार आहे. त्याकरीता 15 व्या वित्त आयोगातुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता घनकचरा व्यवस्थापन साठी बंधनकारक अनुदानाचा पहिला हप्ता Tied Grants एकुण रक्कम रु.2,29,00,874/- प्राप्त आहेत. त्यानुसार15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त रक्कमेतुन वरील प्रमाणे 1 व 2 या मुद्दयांकरीता रक्कम रु.2,29,00,874/- प्रस्तावित कामासाठी खर्च करणेकामी मा.महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरील 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त वरील प्रमाणे खर्चास

मा.महासभेची मंजुरी घेणेकामी सादर करण्यास मंज़ुरीस्तव सविनय सादर.

यावर सहाय्यक स्वच्छता निरिक्षक यांचा अभिप्राय की, घनकचरा विभाग प्रमुख यांचे शिफारसीनुसार प्रस्तावीत अ नुसार कार्यववाहीस्तव सादर.

यावर प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक अहमदनगर महानगरपालिका यांची स्वाक्षरी असे.

यावर मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख अहमदनगर महानगरपालिका यांची स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखाधिकारी अहमदनगर महानगरपालिका यांची स्वाक्षरी असे.

यावर मा. उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, 15 व्या वित्त आयोगानुसार निधीतुन यापुर्वी मंजुर कामे व केलेली तरतुद त्याचबरोबर उर्वरीत निधी उपलब्धतेबाबत खात्री पटवावी.

यावर मुख्यस्वच्छता निरीक्षक यांचेकडून फेरसादर रिपोर्ट की, प्रस्तावित प्रस्तावानुसार मा.आयुक्त यांच्या दिनांक 20 04 2022 रोजीच्या आदेशानुसार 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील अनुदानाचा विनयोगाबाबत तपशील सोबत जोडुन सादर करण्यांत येत आहे.

| **अ.क्र.** | **तपशील** | **अंदाजित खर्च** | **आवश्यक निधी** |
|---|---|---|---|
| 1 | संपुर्ण शहरातील कचरा संकलन व वाहतुक करणे व कचरा संकलन वाहतुक अंतर्गत येणा-या कामाकरीता, स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत सिटी कॉ-ऑर्डीनेटर यांचे मानधन अदा करणे | दर महा अंदाजे 70 लक्ष खर्च प्रमाणे तीन महिन्या करीता रक्कम रु.2,10,00,000/- | रक्कम रु.1,78,96,874/- |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालय क्र.1,2,3 व 4 मधील पावसाळया पुर्वीचे बाह्य यंत्रणेमार्फत नाले सफाई व इतर कामे करणे. | दोन महिन्याकरीता अंदाजे खर्च रक्कम रु.50,04,000/- | रक्कम रु.50,04,000/- |
| | | **एकुण** | **रक्कमरु.2,29,00,874/-** |

वरिल प्रमाणे 01 ते 02 मुद्दे कामांकरीता निधी लागणार आहे. त्याकरीता 15 व्या वित्त आयोगातुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता घनकचरा व्यवस्थापन साठी बंधनकारक अनुदानाचा पहिला हप्ता Tied Grants एकुण रक्कम रु.2,29,00,874/- प्राप्त आहेत. त्यानुसार15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त रक्कमेतुन वरील प्रमाणे 1 व 2 या मुद्दयांकरीता रक्कम रु.2,29,00,874/- प्रस्तावित कामासाठी खर्च करणेकामी मा.महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरील 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त वरील प्रमाणे खर्चास मा. महासभेची मंजुरी घेणेकामी सादर करण्यास मंज़ुरीस्तव सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अवलोकन व्हावे मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, चर्चा करा.

यावर मुख्यस्वच्छता निरीक्षक यांचेकडून दिनांक 19-05-2022 रोजी फेरसादर रिपोर्ट की, प्रस्तावित प्रस्तावानुसार मा.आयुक्त यांच्या दिनांक 21-04-2022 रोजीच्या सुचनेनुसार झालेल्या चर्चे प्रमाणे 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील अनुदानाचा विनयोगाबाबत तपशील सोबत जोडुन सादर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | तपशील | अंदाजित खर्च | आवश्यक निधी |
|---|---|---|---|
| 1 | संपुर्ण शहरातील कचरा संकलन व वाहतुक करणे व कचरा संकलन वाहतुक अंतर्गत येणा-या कामा करीता, स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत सिटी कॉ-ऑर्डीनेटर यांचे मानधन अदा करणे | दर महा अंदाजे 70 लक्ष खर्च प्रमाणे तीन महिन्याकरीता रक्कम रु.2,10,00,000/- | रक्कम रु.1,42,81,874/- |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालय क्र.1,2, 3 व 4 मधील पावसाळया पुर्वीचे बाह्य यंत्रणेमार्फत नाले सफाई व इतर कामे करणे. | दोन महिन्याकरीता अंदाजे खर्च रक्कम रु.50,04,000/- | रक्कम रु.50,04,000/- |
| 3 | WBM of Road In From Burudgaon Kachara Depo To VRDE Compound For AMC | अंदाजे खर्च रक्कम रु.6,14,823/- | रक्कम रु.6,15,000/- |
| 4 | स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान व सफाई मित्र अभियान अंतर्गत कामे करुन घेणे कामी येणा-या खर्च | अंदाजे खर्च रक्कम रु.30,00,000/- | रक्कम रु.30,00,000/- |
| | | **एकुण रक्कम** | **रु.2,29,00,874/-** |

वरिल प्रमाणे 01 ते 04 मुद्दे कामांकरीता निधी लागणार आहे. त्याकरीता 15 व्या वित्त आयोगातुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता घनकचरा व्यवस्थापन साठी बंधनकारक अनुदानाचा पहिला हप्ता Tied Grants एकुण रक्कम रु.2,29,00,874/- प्राप्त आहेत. त्यानुसार 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त रक्कमेतुन वरील प्रमाणे 1 व 4 या मुद्दयांकरीता रक्कम रु.2,29,00,874/- प्रस्तावित कामासाठी खर्च करणेकामी मा.महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरील 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त वरील प्रमाणे खर्चास मा. महासभेची मंजुरी घेणेकामी सादर करण्यास मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, 3 हा बुरुडगांव कचरा डेपोसाठी Approch Road आहे. 1 ते 4 कामे मंजुरीसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

<u>चर्चा</u> :-

**मा. श्री. गणेश कवडे:-** विषय मंजुर करा.

**मा. महापौर मॅडम:-** विषय मंजुर.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त रक्कमेतुन प्रस्तावित कामास ही सभा मान्यता देत आहे.

सफाई मीत्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत सफाई कर्मचा-यांसाठी मा. केंद्र शासनाच्या निदेशानुसार उपकरणे खरेदी करणेसाठी NSKDFC या संस्थे मार्फत कमी व्याज दरात आर्थिक सहाय्य घेणेसाठी ही सभा मान्यता देत आहे. संबंधित विभागाने याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

15 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधी च्या विनीयोगाबाबत महासभा प्रस्ताव क्र.43 दिनांक 12/01/2022 अन्वये ठराव पारीत झाला असुन सदर ठरावात पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक दुरुस्तीसाठी रक्कम रु. 60 लाखाच्या तरतुदीस मंजूरी देण्यांत आलेली आहे..

वरिलप्रमाणे नमुद मंजुर झालेल्या तरतुदीमध्ये प्रभाग क्र. 8 मधील खालील नमुद अत्यावश्यक दुरुस्तीची कामांची शिफारस करणेत येत आहे.

1) विशाखा पटनम- कल्याण महामार्ग क्र. 222 लगत अमित नगर ते जाधव पेट्रोल पंपापर्यंत रस्त्याच्या उजव्या बाजुने असलेल्या 150 एम.एम. व्यासाची डी. आय. लाइन

सातत्याने नादुरुस्त होत असल्याने या कामासाठी रक्कम रु. 23,00,000/- इतक्या रकमेची तरतुद करण्यात यावी.

2) प्रभाग क्र. 8 मधील वारुळाचा मारुती परिसरातील घरकुल योजनेसाठी असलेली पाईप लाईन  सीना नदीला आलेल्या पुरात नदीमध्ये वरिल 200 एम.एम. व्यासाची मुख्य जलवाहिनी वाहुन गेलेली असल्याने सदरची 200 एम. एम. व्यासाच्या जलवाहिनीची दुरुस्ती करणेकामी अंदाजे येणा-या रक्कम रु. 2,00,000/- इतक्या रकमेची तरतुद करणेत यावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

वरिलप्रमाणे नमुद प्रस्तावातील कामे करुन घेण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही लवकरात लवकर करणेत यावी,

नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे,

अनुमोदक :- मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२ प्रस्ताव क्रमांक : ०९ दिनांक:- ०८/०८/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** बुरुडगांव कचरा डेपो व ग्रामस्थांना असलेल्या समस्यांबाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचे दालनात दिनांक 31/12/2021 रोजी महानगरपालिका पदाधिकारी,अधिकारी तसेच बुरुडगाव ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ यांची झालेली बैठक.

बुरुडगांव ग्रामपंचायतीस महानगरपालिकेच्या फुलसौंदर मळा येथील 40 हजार लीटर क्षमतेच्या संपवेल मधून 7.5 अश्वशक्तीच्या मोटार व्दारे पाणी उपसा करुन 6" PVC मुख्य जलवाहिनी व्दारे बुरुडगाव ग्रामपंचायतीच्या 12 हजार लीटर क्षमतेच्या संपवेल मध्ये टाकले जात होते. व ते पाणी उपसा करुन बुरुडगाव ग्रामपंचायतीची 45 हजार लीटर क्षमतेची उंच टाकी भरती जात होती.

दिनांक 31/12/2021 रोजी महानगरपालिका पदाधिकारी, अधिकारी तसेच बुरुडगांव ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ यांची बुरुडगांव ग्रामपंचायत हद्दीत असलेला महानगरपालिका कचरा डेपो व त्याबाबत ग्रामस्थांना असलेल्या समस्यां बाबत बैठक झाली. त्या बैठकीत बुरुडगांव ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी पथदिवे, रस्ता तसेच बुरुडगांव ग्रामपंचायतीस महानगरपालिकेने पाणी पुरवठा करावा अशी मागणी केली असता मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी दिनांक 01/01/2022 रोजी बुरुडगांव ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करणा;या जलवाहीनीची चाचणी घेणे बाबत आदेशीत केले त्या अनुषंगाने दिनांक 01/01/2022 रोजी मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका,मा.विभाग प्रमुख, पाणी पुरवठा विभाग, अहमदनगर महानगरपालिका,मा.सरपंच,बुरुडगांव ग्रामपंचायत व बुरुडगांव ग्रामस्थ यांचे समक्ष 6" जलवाहीनीची चाचणी घेतली असता सदरहू जलवाहीनी बुरुडगांव येथिल सीना नदीपात्रात वाहून गेल्याचे निदर्शनास आले. जलवाहीनी दुरुस्त करणे संदर्भात मा.विभाग प्रमुख, पाणी पुरवठा विभाग यांनी कर्मचारी तसेच ठेकेदार यांना तातडीने आदीशीत केले. सीना नदीपात्रात जलवाहीनी टाकणेचे काम तातडीने हाती घेवून दिनांक 05/01/2022 रोजी पुर्ण करण्यांत आले. व जलवाहिनीची चाचणी घेतली असता बुरुडगांव ग्रामपंचायत संपवेल येथे पाणी पडले.

बुरुडगांव ग्रामपंचायत 6" मुख्य जलवाहिनी वरील 5 नळ जोडणी स्थलांतरीत करणे साठी 2" उपवाहिनी स्वखर्चाने टाकणे साठी परवानगी दिलेली आहे. हे काम देखील प्रगती पथावर आहे. 2" उपवाहिनी टाकून झाल्यानंतर संबंधित नळ जोडणी स्थलांतरीत करण्यात येतील.

बुरुडगांव ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करणारी 6" मुख्य जलवाहिनीची चाचणी यशस्वी झालेली असून बुरुडगांव ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करणे शक्य आहे.

तथापि आपल्या माहितीस्तव व आदेशार्थ सविनय सादर.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालाचे प्राप्त परिस्थिती मध्ये एक दिवसाआड साधारणत: 45 हजार लिटर पाणी बुरुडगांव फुलसौंदर मळा मनपा संपवेल मधुन बुरुडगांव ग्रामपंचायत संपवेल मध्ये पाईपलाईन व्दारे पाणी देणे शक्य होईल. मा.केंद्रशासनाची अमृत योजना पूर्ण झाल्यावर पाणी पुरवठा पूर्ण क्षमते मध्ये वाढ करणे शक्य होईल.

तरी सदरील परीसर मनपा हद्दीत बाहेर असल्याने पाणी पुरवठा करणे बाबत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे व दराबाबत निश्चीती करणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे महापौर यांची मान्यता घेवून G B ला कार्योत्तर साठी सादर करा.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर मॅडम, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

<u>चर्चा</u> :-

**मा. श्री. गणेश कवडे:-** विषय मंजुर करा.

**मा. महापौर मॅडम:-** विषय मंजुर.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजुर.बुरुड्गाव ग्रामस्थांना असलेल्या समस्यांबाबत प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी.खर्च मंजुर.

१. प्रशासकीय प्रस्तावानुसार फुलसौंदर मळा ते बुरुडगाव ग्रामपंचायत येथ पर्यत 6" इंच व्यासाची HDPE पाइपलाईन टाकणे.

२. बुरुडगाव ग्रामपंचायत ते बुरुडगाव कचरा डेपो येथपर्यंत 6" इंच व्यासाची HDPE पाइपलाईन टाकणे. या कामास व सदरहु पोटी येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. बुरुडगाव ग्रामपंचायत, अहमदनगर येथे जलजिवन मिशंन योजने अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना मंजुर असुन मंजुर आराखड्यातील उदभव महानगरपालिका पाणीपुरवठा असुन बुरुड्गाव ग्रामपंचायत यांना ३,३०,००० लीटर पाणी महानगर पालिकेस दररोज द्यावे लागेल. सद्य स्थितीत अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये दिवसाआड तसेच केडगाव उपनगरात दोन दिवसाआड शिवाजीनगर उपनगरामध्ये सात ते आठ दिवसामध्ये पाणीपुरवठा होत आहे. काही भागात टँकर व्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. महानगरपालिका हद्दीत पाणीपुरवठा करण्यास अडचणी आल्यास नागरिकांच्या व नगरसेवकांच्या रोषास सामोरे जावे लागते. त्यामुळे बुरुडगाव ग्रामपंचायत यांना अमृत योजनेचे पाणी शहरात आल्यानंतर शिल्लक राहणा-या पाण्यातुन पाणी पुरवठा करण्यात यावे. या अटीस आधीन राहुन ही सभा मान्यता देत आहे. तसे जलजीवन मिशन अंतर्गत करावयाच्या पुरवठा योजनेसाठीचे प्रमाणपत्र बुरुडगाव ग्रामपंचायत यांना देण्यास ही सभा मान्यता देत आहे. याकामी या अटीवर ही सभा मान्यता देत आहे.

४. जलजीवन मिशनमध्ये वरील दोनही पाईपलाइन होत असल्यास महानगरपालिका स्तरावर पाईपलाईन करण्यात येउ नये.

नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले,

अनुमोदक :- मा.श्री.उमेश खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२ प्रस्ताव क्रमांक : १० दिनांक:- ०८/०८/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** 'अमृत' अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजना मंजुर बचत-वाढ विवरणपत्र (Excess Saving Statement ) च्या अनुषंगाने कलम-38 व अतिरिक्त बाबीचे काम करणेबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : १) मा. महासभा प्रस्ताव क्र. १८, दि. १४/०८/२०१९ अन्वये ठराव

२) मा. महासभा प्रस्ताव क्र. ०१, दि. ११/०६/२०२१ अन्वये ठराव

३) मा.अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा. मुंबई यांना अग्रेषित मा. मुख्य अभियंता यांचे जा.क्र. २०८० दि. २६/११/२०२१ रोजीचे पत्र

४) मा. सह सचिव, नगर विकास विभाग यांना अग्रेषित मा. अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा. CPDM यांचे पत्र क्र. १४२ दि. १४/०३/२०२२

५) दि. १७/०३/२०२२ रोजीची SLTC ची बैठक

६) मा. सह सचिव, नगर विकास विभाग यांचे अमृत/ २०२२ / प्र.क्र.२४/नवि-३३ यांचे दि. १२/०४/२०२२ रोजीचे पत्र

७) मा. अधिक्षक अभियंता, यांत्रिकी यांचे दि. ०४/०५/२०२२ रोजीचे प्रमाणपत्र

८) कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. अहमदनगर यांचे जा.क्र. ८९३ दि. ११/०५/२०२२ रोजीचे पत्र (म.न.पा. स प्राप्त दि. १८/०५/२०२२

विषयांकित योजने मधील स्थापत्य काम मे. शोनन इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि. व यांत्रिकी काम मे. इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीयल एन्टरप्रायजेस, अहमदनगर यांचेमार्फत प्रगतीपथावर असून या कामासाठी मा. शासनाने म. जी. प्रा. या विभागाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा., अहमदनगर यांचे संदर्भिय पत्र क्र. ८ प्राप्त झाले असून खालील प्रमाणे कळविले आहे.

" विषयाकित योजनेत नविन ४५ द.ल.लि. जलशुध्दीकरण केंद्रावर नविन पंपीग मशिनरी बसविणे व इतर वाढीव यांत्रिकी कामे यांना मा. अधिक्षक अभियंता (यां.) बेलापुर, नवी मुंबई यांची तांत्रिक सहमती घेणे बाबत सुचित केले होते. त्या अनुषंगाने योजनेतील वाढीव यांत्रिकी कामांना मा. अधिक्षक अभियंता (यां.) यांची तांत्रिक सहमती घेण्यात आलेली आहे.

अमृत योजनेचे काम लवकर पूर्ण करावयाचे असल्याने ४५ द.ल.ली. जलशुध्दीकरण केंद्रावर नविन पंपीग मशिनरी बसविण्याचे काम योजनेचे कामा योजनेचे यांत्रिकी कामाचे ठेकेदार मे. इलेक्ट्रीकल ॲण्ड इंडस्ट्रीयल एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचे मार्फत करणे संयुक्तीक राहिल. सदर कामाची अतिरिक्त बाब दरसुची करावी अथवा नविन निविदा करणे याबाबत अंतीम निर्णय आपले स्तरावरून घेणे उचित ठरेल. " असे इकडेस कळविले आहे.

या अनुषंगाने सादर की, विषयांकित योजनेचे बचत- वाढ विवरणपत्र म.जी.प्रा. ने मा. शासनाकडे सादर केले होते. या अनुषंगाने दि. १७/०३/२०२२ रोजी SLTC ची बैठक संपन्न झाली. सदरच्या बैठकीत पाणी पुरवठा योजनेच्या बचत - वाढ विवरण पत्रास SLTC ची मान्यता मिळाली असून त्याबाबत संदर्भिय पत्र क्र. ६ अन्वये म.न.पा.स कळविण्यात आले आहे.

योजनेचे PMC म.जी.प्रा. यांनी सादर केलेल्या बचत-वाढ विवरण पत्र व त्या अनुषंगाने सादर प्रस्तावास काही अटी व शर्तीस अधीन राहून राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) ची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने पृष्ठ क्र. २ वरील बाब क्र. "फ " च्या अनुषंगाने यांत्रिकी कामात मोठा बदल झाला असल्याने अधिक्षक अभियंता, यांत्रिकी म.जी.प्रा. यांचेकडून प्रमाणपत्र २ दिवसात सादर करणेची बाब समाविष्ठ आहे.

कार्यकारी अभियंता यांनी संदर्भिय पत्र क्र. ८ अन्वये विळद येथील नविन जलशुध्दीकरण केंद्रा जवळ पंपीग मशिनरी उभारणे व विद्यूत कामे करणेच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व म.जी.प्रा. चे अधिक्षक अभियंता यांचेकडील यांत्रिकी कामाचे प्रमाणपत्र सादर केले आहे.

म.जी.प्रा. ने सादर केलेल्या अतिरिक्त बाबींच्या अनुषंगाने विविध उपांगामध्ये खालील प्रमाणे प्रस्तावित केले आहे.

**(Amt in Rs. )**

| Sr No | Name of Subwork | Amount paid to Contractor | Amount to be paid to Contractor | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Provision for SCADA & Automation for 45 MLD WTP | 24,67,810.08 | 6,90,49,755.00 | 7,15,17,565.00 |
| 2 | Repairs to Elecriccal & Mechnical parts of 16 MLD WTP | 46,72,028.00 | 1,13,84,205.32 | 1,60,56,233.32 |
| 3 | Provision for SCADA & Automation for 16 MLD WTP | 8,35,461.00 | 1,09,53,156.00 | 1,17,88,617.00 |
| 4 | Repairs to Elecriccal & Mechnical parts of 22 MLD WTP | 73,85,056.25 | 92,77,643.99 | 1,66,62,700.24 |
| 5 | Provision for SCADA & Automation for 22 MLD WTP | 15,15,215.00 | 98,33,669.00 | 1,13,48,884.00 |
| 6 | Repairs to Elecriccal & Mechnical parts of 35 MLD WTP | 67,62,091.00 | 85,05,526.00 | 1,52,67,617.00 |
| 7 | Provision for SCADA & Automation for 35 MLD WTP | 9,46,189.00 | 1,43,51,614.00 | 1,52,97,803.00 |
| | **Total** | | | **15,79,39,419/-** |

विषयांकित कामाची स्विकृत निविदा रक्कम ही रू. ७,२२,०१,२२३/- इतकी आहे. म.जी.प्रा. ने सादर केलेल्या प्रस्तावा नुसार या कामासाठी रू. १५,७९,३९,४१९/- इतका खर्च येणार आहे.

योजनेच्या अनुषंगाने येणा-या अतिरिक्त खर्चासाठी मा. महासभेने संदर्भिय ठराव क्र. ०१ व ०२ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच या कामांसाठी मा. शासनाच्या SLTC ची देखील मान्यता प्राप्त झालेली आहे. योजनेचे PMC यांनी योजनेअंतर्गत प्रस्तावित ४५ MLD क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राजवळ यांत्रिकी व विद्यूतची अतिरिक्त कामे ही यांत्रिकी कामाचे ठेकेदार मे. इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीयल एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचे

मार्फत करून घेणे संयुक्तीक राहिल असा अभिप्राय दिलेला आहे. तसेच निविदेच्या रक्कमेत मोठया प्रमाणात वाढ होत असल्याने सदरचा प्रस्ताव मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर करणे योग्य वाटते.

करिता

१) पाणी पुरवठा योजनेअंतर्गत प्रस्तावित यांत्रिकी व विद्यूतची अतिरिक्त कामे ही यांत्रिकी कामाचे ठेकेदार मे. इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीयल एंटरप्राजेस, अहमदनगर यांचे मार्फत करून घेणे बाबतचा म.जी.प्रा. ने दिलेल्या अभिप्राया नुसार म.न.पा. च्या लेखा व लेखा परिक्षण विभागामार्फत तपासणी करून त्यानुसार कार्यवाही करणे योग्य.

२) पाणी पुरवठा योजनेसाठी येणा-या अतिरिक्त खर्चा बाबत मा. महासभेची मंजूरी प्राप्त आहे. त्यामुळे या कामां बाबत पुढील कार्यवाही करणेस योजनेच्या कामात म.जी.प्रा. ने शिफारस केले नुसार मोठया प्रमाणात बदल होत असल्याने सदरची बाब नंतर अवलोकनार्थ मा. महासभेकडे सादर करणेस

ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, संदर्भ क्र 6 SLTC बैठकीतील निर्णयानुसार मान्यतेस सादर. यामधील मुद्दा क्रमांक 2 (III) बैठकीतील निर्णयानुसार मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मुळ अंदाजपत्रकात PMC ने योग्य तरतुद केली असती तर आज रोजी वाढीव तरतुदीमुळे मनपास आर्थिक नुकसार झाले नसते सदर वाढीव बाबींसाठी येणारा खर्चासाठी केंद्र राज्य शासनाकडून अनुदान मागणी साठी विभागाने पत्रव्यवहार करावा जेणेकरुन मनपावर आर्थिक बोजार पडणार नाही. संदर्भ क्रमांक 6 दिनांक 12/04/2022 चे पत्रातील अटी व शर्तींची संबंधित विभागाने पुर्तता करुन पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मुलेप यांचे अभिप्राय नुसार यापुर्वीच SLTC ने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे अभिप्राय विरुध्द ठरत आहेत. अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर मॅडम, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

## चर्चा:-

**मा.श्री.उमेश कवडे** :- विषय मंजुर करा.

**मा.महापौर मॅडम** :- विषय मंजुर.

---*---

ठराव:-

१) यांत्रिकी व SCADA या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये PMC ने मोठा बदल केलेला आहे. सदरच्या प्रस्तावास SLTC ने मान्यता दिलेली असुन त्यानुसार सर्व प्रस्तावित कामे करणेस व येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

२) SLTC च्या मंजुर प्रस्तावाच्या व्यतिरिक्त योजनेच्या अनुषंगाने काही अतिरिक्त बाबी/कलम -३८ उद्भवल्यास सदरच्या कामास व खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

३) मा. शासनाच्या SLTC ने दि. १२/०४/२०२२ रोजी या योजनेच्या सुधारित प्रस्तावास दिलेल्या मान्यतेनुसार कामे करुन घेणेस व योजनेचे PMC यांनी जा.क्र. ८९३ ते १८/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सुचविलेनुसार यांत्रिकी/SCADA मधील जादाची कामे, ही मे.इंडस्ट्रीयल अॅण्ड इलेक्ट्रीकल एन्टरप्रायजेस यांचे मार्फत करुन घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

४) योजनेचे PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांनी या योजनेच DPR तयार केला आहे. असे असुनही म.जी.प्रा.कडून या प्रकल्पामध्ये पंपींग मशिनरीची मोठी बाब प्रस्तावित करावयाची राहिली होती. यामुळे योजना पूर्ण करणेस विलंब झालेला आहे.
याबाबतचा अहवाल मा.आयुक्त यांनी मा.प्रधान सचिव, नवि-2 व मा.सदस्य सचिव,म.जी.प्रा. यांना सादर करावा व म.जी.प्रा.चे जबाबदार प्रतिनिधी असतील त्यांचेवर कारवाई करणेसाठी त्यांना विनंती करावी. असे आदेश देत आहे.

५) विळद येथील जलशुध्दीकरण केंद्र, पंपींग स्टेशन, शुध्द पाणी संपवेल इत्यादीची दुरुस्ती बाकी आहे. त्यासाठी PMC मार्फत स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करुन घेवून त्यानुसार दुरुस्तीचे कामे करुन घ्यावीत.

६) अमृत अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या अनुषंगाने शेतकरी नुकसान भरपाई, रेल्वे क्रॉसिंग व महामार्ग क्रॉसींग शुल्क,PMC चार्जेस, वन विभागाची परवानगी, मल्टी मिडीया चार्जेस, MSEDCL चे समायोजन असे जवळपास रु.8.00 कोटीचा झालेला खर्च या योजनेसाठी प्राप्त निधीमधून केलेला आहे. भविष्यात ही रक्कम योजना पूर्ण करणेकामी लागणार आहे. त्यामुळे लेखा विभागाने म.न.पा. हिस्सा पोटी ही रक्कम म.न.पा.खात्यातून वर्ग करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे.

७) पाणी पुरवठा योजनेची निविदा 7% जादाची आहे. त्यामुळे जवळपास रु.7.00 कोटी अतिरिक्त निधी लागणार आहे. ही रक्कम देखील म.न.पा.हिस्सा म्हणून सदर खात्यात वर्ग करावी. तसेच यासाठी कर्जाची उभारणी करणे आवश्यक असल्यास सदरचे कर्ज हे शासकीय/ खाजगी संस्थेकडून उपलब्ध करुन घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

८) PMC ने नव्याने उभारत असलेल्या पंपींग स्टेशनसाठी 1250 KVA चे 2 ट्रान्सफार्मर प्रस्तावित केले आहेत. भविष्यात योजना सुरळीत चालविणेच्या दृष्टीकोनातून 1250 KVA ऐवजी 2500 KVA चे 2 ट्रान्सफार्मर बसविणेस व त्यासाठी येणा-या जादाच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक : मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

अनुमोदक: मा.श्री.प्रकाश बाबुराव भागानगरे

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२** **प्रस्ताव क्रमांक : ११** **दिनांक:- ०८/०८/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.केंद्रशासनाच्या **"अमृत २.०"** या अभियान अंतर्गत शासन निर्णयानुसार नमूद विविध योजनेची अंमलबजावणी करणेसाठी मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : १) मा. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अमृत २०१५/प्र.क्र. २०३/ नवि - ३३ दि. १३ ऑगस्ट २०१५
२) मा. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. अमृत २०१५/प्र.क्र. १९७/ नवि - ३३ दि. १३ ऑक्टोबर २०१५
३) अमृत २.० अभियानाच्या केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना दि.०१/१०/२०२१
४) मा. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. अमृत २०२२/प्र.क्र. १४१/ नवि - ३३ दि. १४ जुलै २०२२

**टिप्पणी :**

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की, मा. केंद्र शासनाने "अमृत २.०" योजनेची घोषणा केलेली आहे. त्या अनुषंगाने योजनेच्या मार्गदर्शक सुचना केंद्र शासनामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. (मार्गदर्शक सुचना सोबत सलग्न करण्यात आलेलाआहे )

या अनुषंगाने राज्य शासनाने दि. १४ जुलै २०२२ रोजी पार पाडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्याच्या नागरी भागामध्ये मुलभूत पायाभूत सुविधांचा अभाव दुर करण्यासाठी केंद्र पुरस्कृत अमृत २.० योजना (Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation २.० ) राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सन २०२१-२०२२ ते २०२५-२०२६ या कालावधीमध्ये राबविण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतलेला आहे. (संदर्भ क्र. ४ शासन निर्णय सोबत सलग्न करण्यात आलेलाआहे )

शाश्वत विकासाच्या ध्येयांमधील पाणी पुरवठयाचे ध्येय गाठण्यासाठी राज्यातील सर्व शहरातील घरांना नळ जोडणी देवून पाणी पुरवठयाच्या बाबतीत शहरे १०० % स्वयंपूर्ण करावे, जलस्त्रोत पुर्नरूज्जीवन व शहरातील मोकळया जागेमध्ये उदयाने व हरित क्षेत्र विकसित करणे आणि ४४ अमृत १.० शहरांमध्ये १०० % मल प्रक्रिया व मल:निस्सारण व्यवस्था स्थापित करून मल:प्रवाहावर १०० % प्रक्रिया करण्याची व्यवस्था उभारणे ही या योजनेची प्रमुख उद्दीष्ठे आहेत.

संदर्भ क्र. ४ चे शासन निर्णयाचे अनुषंगाने खालील प्रमाणे ठळक बाबी नमूद करण्यात येत आहे.

१) अमृत २.० अभियानाची व्याप्ती : अमृत २.० अभियानाअंतर्गत राज्यातील सर्वच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा समावेश करण्यात आलेला आहे. अमृत २.० अभियानाची अमंलबजावणी करण्या संदर्भात केंद्र शासन, राज्य शासन व संबधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या वतीने दि. २९ सप्टेंबर २०२१ रोजी प्रत्येक शहरासाठी सामंजस्य करार साक्षांकित देखील करण्यात आलेला आहे.अमृत २.० या अभियानाअंतर्गत राज्यातील सर्वच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पाणी पुरवठयाच्या बाबतीत स्वंयपूर्ण करून प्रत्येक घरात नळ जोडणी देण्यात येईल आणि यापूर्वीच्या अमृत अभियानाअंतर्गत समाविष्ठ असलेल्या ४४ शहरांमध्ये १०० % मलः निस्सारण व्यवस्था देखील उभारण्यात येईल.

या अभियानाअंतर्गत खालील घटकांसाठीचे प्रकल्प समाविष्ट करण्यात येतील.

१) मल:निस्सारण प्रकल्प
२) सांडपाण्याच्या पुनर्वापर व पुर्नप्रक्रिया प्रकल्प
३) जलसाठयांचे पुनरूज्जीवन प्रकल्प
४) हरित क्षेत्र प्रकल्प

२) सध्या चालू असलेल्या अमृत अभियानाचा कालावधी : सन २०१५ पासून राज्यात राबविण्यात येत असलेल्या अमृत अभियानअंतर्गत सध्या चालू असलेल्या प्रकल्पांसाठी दि.३१/०३/२०२३ पर्यंत अर्थ सहाय्य मिळणार आहे. त्यानंतर सदरच्या प्रकल्पांना शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात येणार नाही.

३) वित्तीय आकृतीबंध : या योजनेअंतर्गत ' ड ' वर्ग महानगरपालिकेसाठी खालील प्रमाणे आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे.

केंद्र शासन - ३३.३३ %
राज्य शासन - ३३.६७ %
म.न.पा. हिस्सा - ३० %

४) स्वहिश्याच्या निधीची उभारणी : राज्य शासनाने तसेच, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी स्व-हिश्याचा निधी उभारतांना म.न.पा. बॉण्ड, कर्ज, राज्य शासनाचे अनुदान, केंद्रीय वित्तीय आयोग अनुदान याचा वापर करावा. त्याच प्रमाणे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना अमृत २.० अभियानअंतर्गत प्रकल्प किंमतीपैकी स्व-हिश्याची रक्कम वित्तीय संस्थाकडून कर्ज घेवून उभारता येईल व त्या करिता आवश्यकते नुसार शासनाची परवानगी घ्यावी. राज्य शासनास देखील आवश्यकते नुसार आशियाची विकास बँक, जागतिक बँक इत्यादी संस्थाकडून अर्थसहाय्य घेता येईल.

या अभियानाच्या अनुषंगाने शहराच्या पाण्याचा, शहर जलकृती आराखडा, राज्य जलकृती आराखडा इत्यादी आराखडे तयार करून ऑनलाईन पध्दतीने केंद्र शासनाच्या पोर्टलवर भरण्यात आलेली आहे.

५) त्रिस्तरीय संस्थात्मक व्यवस्था :

अमृत २.० अभियानाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय संस्थात्मक व्यवस्था असेल त्यामध्ये केंद्र शासनाच्या स्तरावर केंद्रीय सचिव, शहरी विकास मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती (Apex Committee) असेल, राज्यात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य उच्चाधिकार सुकाणू समिती (State High Power Steering Committee) व प्रधान सचिव (नवि- २) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समिती (State Level Technical Committee) यांचा समावेश राहील. आणि जिल्हा स्तरावर नागरी क्षेत्रातील विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी व सनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती अमृत २.० अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेईल व मंजूर प्रकल्पांचे सनियंत्रण करेल. शिखर समिती, राज्य उच्चाधिकार सुकाणू समिती व राज्यस्तरीय तांत्रिक समिती या सर्व समिती मा.शासना मार्फत स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

१) कार्यात्मक फलनिश्चिती :

मूळच्या ४४ अमृत शहरांमध्ये किमान २००० कुटुंब राहत असल्याने एका प्रभागात २४x७ नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठयाचा प्रकल्प हाती घेणे आवश्यक आहे.

२) त्रयस्थ आढावा व संनियंत्रण संस्था :

(IRMA) केंद्र शासनाकडून प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र त्रयस्थ आढावा व संनियंत्रण संस्थेची (Independent Review and Monitoring Agency ) निवड करून देण्यात येईल. त्यांचे मार्फत राज्यात अमंलबजावणी होणा-या प्रकल्पांचा त्रयस्थ आढावा घेतला जाईल.

३) प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (PDMC) :

अमृत २.० अभियानासाठी केंद्र शासनाने विहीत केल्यानुसार व त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या आरएफपी नुसार प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (PDMC) संस्थेची नियुक्ती करण्यात येईल.

४) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC ) :

अमृत २.० अभियानाअंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून खाजगी सल्लागारांची नियुक्ती करण्यात स्थानिक स्वराज्य संस्थाना मुभा राहिल. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना प्रचलित धोरणा नुसार कमाल ३ % मर्यादेत प्रकल्प व्यवस्थापन शुल्क आकारण्यास अनुमती राहिल. यासाठीचे निकष विकास विभागाच्या स्तरावरून निश्चित करण्यात येतील.

५) तांत्रिक मान्यता शुल्क प्रकल्प किंमतीत समाविष्ट करणे :

प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना प्रशासकीय मान्यता देताना प्रकल्प किंमतीमध्ये तांत्रिक मान्यतेचे शुल्क अंतर्भूत करण्यात यावे.

६) शहर स्तरावरील अभियान व्यवस्थापन कक्ष -

राज्य अभियान संचालनालयाच्या धर्तीवर प्रत्येक महानगरपालिका स्तरावर संबधीत आयुक्त महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली शहर अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात यावा.

७) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी :

अमृत २.० अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रकल्पांचे राज्यस्तरीय तांत्रिक समिती समोर सादरीकरण करणे, प्रशासकीय मान्यता मिळालेनंतर निविदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देणे व प्रकल्पांची अमंलबजावणी करणे, प्रकल्प पूर्ण करणे, त्यातील उदिदष्टे पूर्ण करणे, पेय जल सर्वेक्षणामध्ये सक्रियपणे सहभागी होणे, सर्व सुधारणांची वेळेत अमंलबजावणी केली जाईल याची दक्षता घेणे इत्यादी सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी संबधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहिल.

८) मॉडेल निविदा प्रपत्र : अमृत २.० अभियानाच्या मार्गदर्शक सुचनां नुसार मॉडेल निविदा प्रपत्र प्रधान सचिव, नवी-२ यांचे अध्यक्षते खालील राज्य स्तरीय तांत्रिक मान्यता समितीच्या मान्यतेने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना उपलब्ध करून देण्यात यावे.

मा.शासनाच्या धोरणानुसार पाणी पुरवठा योजना व जलसाठयांचे पुनरूज्जीवन या दोन प्रकल्पांसाठी अंदाजे रू. १८५.०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. PMC सेवा व शहर स्तरावरील अभियान व्यवस्थापन कक्ष याकरिता रू. ६.०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

अहमदनगर महानगरपालिकेत अमृत अभियान २.० अहमदनगर शहर विकास साधणेच्या दृष्टीकोनातून अमृत अभियानात नमूद योजनांचे सविस्तर अंदाजपत्रके व आराखडे / प्रस्ताव तयार करून मा. केंद्र शासनाच्या "अमृत २.० " अभियानाअंतर्गत शासन निर्णया नुसार विविध प्रकल्प राबविणे, PMC ची नेमणूक करणे, आकृतीबंधा नुसार विविध स्तरातून म.न.पा. हिस्सा उपलब्ध करणे, शहर स्तरावरील अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करणे व या कामासाठी येणा-या खर्चास मा. महासभेची मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहिल.

तथापि मा.शासनाकडे अहमदनगर महानगरपालिकेचा प्रकल्प अहवाल लकरात लवकर सादर करणेच्या दृष्टीने मा.महासभेची मंजूरी प्राप्त होणेचा कालावधी लक्षात घेता, नमूद प्रकल्प अहवाल तयार करणेचक काम लगेच हाती घेणे संयुक्तीक असल्याने सदर कामी महानगरपालिका पॅनल यांची नेमणूक करुन प्रकल्प अहवाल तयार करणे उचित राहील. मे.यश इनोव्हेटीव्ह औरंगाबाद यांची नेमणूक करुन प्रकल्प अहवाल तयार करणे उचित राहील. मे.यश इनोव्हेटीव्ह औरंगाबाद यांचा दर प्रकल्प अहवाल किंमतीच्या १.७०% इतका आहे.

तरी १) सादर प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेस

२) दरम्यानच्या काळात प्रकल्प अहवाल (अमृत २.० च्या मार्गदर्शक सुचनांनुसार) तयार करणेकामी मे.यश इनोव्हेटीव्ही औरंगाबाद यांचे मार्फत हाती घेणेस व तसे कार्यारंभ आदेश त्यांना देणे.

यावर मा.जल अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मान्यता मिळणेस विनंती आहे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, स्थायी समितीने Water supply करीता एकूण ३ संस्थांना Smpanel केले आहे. पाणी पुरवठा विभागाने प्रस्तावित केलेल्या संस्थेची निवड न करता सदर तीनही संस्थांकडून समकक्ष कामातील अनुभवा बाबत कागदपत्रे मागवून संस्थेची निवड करणे योग्य राहील.

DPR झालेवरच खर्चाचा प्रत्यक्ष अंदाज येईल असे मत आहे. मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मा.मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायानुसार विभागाने कार्यवाही करणे संयुक्तीक राहील तथापि आदेशार्थ सादर.

यावर जल अभियंता यांचेकडून फेरसादर रिपोर्ट की, अमृत २.० अभियना अंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करणेकामी विभागाने प्रस्तावित केलेली संस्था मे.यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन LLP, औरंगाबाद ही संस्था मा.स्थायी समितीने वॉटर सप्लाय करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड केलेल्या तीन संस्थेपैकीच एक संस्था आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणूनच्या कामापोटी या संस्थेचे दर १.७० % हे ठरलेले आहे. (सोबत संबंधित संस्थेला देण्यांत आलेला कार्यारंभ / कार्यादेश पत्र)

करीता मुळ प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की. अ मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

## चर्चा:-

**मा.श्री.उमेश कवडे** :- विषय मंजुर करा.

**मा.महापौर मॅडम** :- विषय मंजुर.

---*---

## ठराव:-

मा.केंद्रशासनाच्या "अमृत 2.0" अभियान अंतर्गत अंतर्भूत असलेल्या योजनांची अंमलबजावणी ही मा.शासनाच्या दि.14/07/2022 रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने करणे, मल:निस्सारण प्रकल्प, पाणी पुरवठा प्रकल्प, जलसाठयांचे पुनरुज्जीवन प्रकल्प इत्यादी प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी, सदरचे प्रकल्प राबविणेसाठी, या प्रकल्पाच्या कामासाठी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

<u>**सदर शासन निर्णयातील अंतर्भूत योजना :-**</u>

* मलनिस्सारण प्रकल्प
* सांडपाण्याचा पुनर्वापर व पुर्नप्रक्रीया प्रकल्प
* जलसाठयांचे पुनरुज्जीवन प्रकल्प
* हरीत क्षेत्र प्रकल्प
* पाणी पुरवठा प्रकल्प

वरिल सर्व योजनांची अंमलबजावणी ही शासनाचे मार्गदर्शक सूचना व दिनांक 14/07/2022 रोजीचा शासन निर्णय व शासनाकडून भविष्यात पारीत होणा-या शासन निर्णयानुसार करण्यांत यावी.

* पाणीपुरवठा योजनेच्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम मे.यश इनोव्हेटीव्ह, औरंगाबाद यांना प्रदान करणे व येणा-या खर्चासाठी ही सभा मान्यता देत आहे.

* मल:निस्सारण योजनेच्या प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम मे.द निसर्ग कन्सलटंसी, नाशिक यांना प्रदान करणे व येणा-या खर्चासाठी ही सभा मान्यता देत आहे.

* जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम मे.द निसर्ग कन्सल्टंसी, नाशिक यांना प्रदान करणे व येणा-या खर्चासाठी ही सभा मान्यता देत आहे. या प्रकल्प अहवालामध्ये पिंपळगांव येथील तलावाचे सुशोभिकरण, खोलीकरण, मजबुतीकरण इत्यादी बाबी समाविष्ठ कराव्यात.

* वरिल नमुद योजनेसाठी शासन निर्णयानुसार उभारावयाचा मनपाचा स्वहिस्सा हा 15 व्या वित्त आयोग, शासनाकडून प्राप्त होणारा निधी, कर्ज स्वरुपात उभारणेस व शासन निर्णयात नमूद केलेनुसार कार्यवाही करुन स्वहिस्सा उभारणेस ही सभा मान्यता देत आहे.

* तयार करण्यात येणा-या प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता घेणे कामी येणा-या खर्चाची तरतूद प्रकल्प अहवालात नमूद करावी.

* राज्य अभियान संचालनालयाच्या धर्तीवर महानगरपालिका स्तरावर मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली शहर अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

* अहमदनगर महानगरपालिकेने दिनांक 14/07/2022 रोजीच्या शासन निर्णयातील पृष्ठ क्रमांक 12 वरील मुद्दा क्रमांक 37 नुसार सर्व जबाबदारी पार पाडावी.

* कार्यात्मक फलनिश्चीती करीता शहराच्या नगर-कल्याण महामार्गाच्या बाजूच्या असणा-या परिसराचा अभ्यास करुन किमान 2000 कुटुंबा करीता 24x7 नळ जोडणीव्दारे पाणी पुरवठयाचा प्रकल्प हाती घ्यावा.

**पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्प अहवालामध्ये खालील बाबी समाविष्ट करणेस ही सभा मान्यता देत आहे. :-**

1) मुळानगर, विळद, नागापूर, वसंतटेकडी येथील पंपींग मशिनरी आवश्यकते नुसार नव्याने प्रस्तावित करावी.

2) मुळानगर ते विळद, नागापुर ते वसंत टेकडी या दरम्यान नविन जलवाहिनीची गरज असल्यास प्रस्तावित करावी.

3) अहमदनगर-कल्याण महामार्गाच्या व अहमदनगर शहर बाह्य वळण रस्त्याच्या बाजूच्या परिसराचा विकास मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे या भागासाठी नागापूर येथील पंपहाउस मधून स्वतंत्र उर्ध्ववाहिनी व त्या परिसरामध्ये उंच टाक्या व वितरण व्यवस्थेची तरतूद करावी.

4) शहरामधील अस्तित्वातील जुन्या टाक्यांचे सर्वेक्षण करुन त्याऐवजी नवीन टाक्यांची तरतूद करावी. तसेच वाढीव भागासाठी नविन उंच टाक्या प्रस्तावित कराव्यात. या टाक्यांसाठी जागा आवश्यक असल्यास या जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी नगररचना विभागाची राहील.

5) शहराची वाढ सर्व बाजूने झपाटयाने होत आहे. त्यामुळे वाढीव भागासाठी वितरण व्यवस्थेचा सर्व्हे करुन वितरण नलिका प्रस्तावित कराव्यात.

6) वितरण व्यवस्थेचे काम करतांना रस्त्यांची झालेली तूटफूट या दुरुस्तीची तरतूद अंदाजपत्रकात करावी.

7) शहरातील सर्व टाक्यांना संरक्षक भिंत, वॉचमन केबीन इत्यादी बाबी प्रस्तावित कराव्यात.

8) शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी विद्युत बिलापोटी मोठा खर्च होतो आहे. याच्या अनुषंगाने पूर्ण क्षमतेचा सौर उर्जा प्रकल्प पिंपळगांव माळवी येथील महानगरपालिकेच्या जागेमध्ये प्रस्तावित करावा.

9) अहमदनगर शहराच्या लगत असलेल्या भिंगार, बु-हाणनगर, बुरुडगांव इत्यादी परिसराचा मनपा हद्दीत समावेश होण्याची शक्यता असल्याने त्या परिसरासाठी लागणा-या अतिरिक्त पाण्याची निकड पाहून योजनेचे आराखडे तयार करण्यात यावे.

10) पिंपळगाव माळवी येथील तलावाचे पुर्नजिवीत करुन कामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावा.

11) केडगांव प्रभागा करीताचे पाणी पुरवठा योजना सुधारीत करावी.

12) शहरातील सर्व नळ कनेक्शनला मीटर बसविण्यात यावेत. सदरच्या मीटर्स पोटी येणा-या खर्चाची तरतुद पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्प अहवालात करावी.

**भुयारी गटार योजना टप्पा-2 या योजनेच्या प्रकल्प अहवालात खालील बाबी समाविष्ट करणेस ही सभा मान्यता देत आहे.** :-

1) भुयारी गटार योजनेच्या पहिल्या टप्प्यात राहिलेला अनुशेष या योजनेच्या टप्पा-2 च्या प्रकल्प अहवालात समाविष्ट करण्यात यावा.

2) सावेडी,नागापूर, बोल्हेगांव, शिवाजीनगर, केडगांव, मुकुंदनगर या परिसरामध्ये भुयारी गटार योजना प्रस्तावित करण्यात यावी.

3) यापूर्वीच्या प्रकल्पातील मैलाशुध्दीकरण केंद्राची क्षमता व नव्याने प्रस्तावित करण्यात येत असलेल्या भागाचा विचार करता आवश्यकते नुसार नवीन मैलाशुध्दीकरण केंद्र प्रस्तावित करावे.

सुचक : मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे,

अनुमोदक : मा.श्री.शाम किसन नळकांडे,

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२** **प्रस्ताव क्रमांक : १२** **दिनांक:- ०८/०८/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

सौ.लताबाई बलभिमराव शेळके माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 08/08/2022 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

---*---

**ठराव :**

नोंद घेण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**चर्चा :-**

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आमच्या वॉर्डात पाण्याची लाईन टाकायचे अधिकार आम्हाला नाही. छोटा वॉल टाकता येत नाही. आपले कर्मचारी नागरिकांना सांगतात नगरसेवकाला सांगा महानगरपालिका काय करते.

रस्ता पॅचिंगचा विषय उपनगरात 12 मीटर व त्यावरील रस्ते पॅचिंग मध्ये घेतले पाहीजे हे प्रश्न किती दिवस पेंडींग ठेवणार याचे उत्तर द्या.

**मा.आयुक्त साहेब :-** ओढा नाल्याचे प्रेझेंटेशन मी दुपारच्या सभेत आपल्याला सविस्तर प्रेझेंटेशन दाखवितो.

**मा.श्री.पाअुलबुधे विनीत :-** या सगळयाला जबाबदार कोण हे अगोदर ठरवा. लोकांचे देव पाण्यात आहेत. धान्य पाण्यात आहे. तुम्ही जे दाखवणार त्याचे प्रकार अगोदर झाले आहे. स्वत: मायकलवार यांनी जुना पिंपळगाव रस्त्याला पाहणी केली व दोन पाईप टाकुन दिले. थातुर मातुर कारवाई चालणार नाही.

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :-** प्लॉटींग ले आउट मध्ये ओढे पुर्ण बुजले आहेत. नष्ट झाले आहेत. ओढयात प्लॉट मंजूर केले आहेत.

**मा.सौ.रुपाली वारे :-** वैष्णव कॉलनीत ओढा आहे. त्याच्या पुढे ओढा दिसुन येत नाही.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** दर पावसाळयात हाच प्रश्न सगळयांना पडतो. नेवून दाखवले पण पहिले पाढे पंच्चावन्न.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ओढयावर प्लॉट नसतील असे जर कोणी म्हणत असेल तर मी माझा राजीनामा देतो. चारठाणकर साहेब सांगतील का तुम्ही ओढ्या नाल्यावर लेआऊट तयार केलेला नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** शहरामध्ये जी पुरपरिस्थीती निर्माण झाली आहे या पूर परिस्थितीवर प्रत्येक वर्षी यावर चर्चा होते. विविध 20 ओढे स्वच्छ करतो. त्यापैकी काही ओढयांचे पुर्वी नाल्याचे प्रवाह गाव नकाशात दिसुन येतो. ड्रोन सर्व्हे केला पाईप टाकुन ओढे अडवले आहेत. त्याचे प्रेझेंटेशन केले आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** प्रेझेंटेशन मध्ये कोठे पाईप टाकले हे दर्शविण्यात आले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** तुम्ही त्यांचेवर कारवाई करा.

**मा.आयुक्त साहेब :-** नियमाप्रमाणे 100% कारवाई करण्यांत येईल. नोटीस देवून कारवाई केली जाईल. पाईप काढावे लागले तर ते काढण्यात येतील. नियमाप्रमाणे सर्व कारवाई करु. रद्द करण्याची प्रोसेस पार पाडावी लागेल. MRTP अँक्ट नुसार प्रोसेस करुन कारवाई करण्यांत येईल. चुक झाली असेल तर दुरुस्ती करता येईल.

**मा.सौ.रुपाली वारे :-** किती लोकांच्या घरात पाणी घुसले. किती नुकसान झाले या प्रशासनाने सर्व्हे केला का.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ओढया नाल्यात पाईप टाकले ओढा बुजविला टी.पी.तील भ्रष्टाचारावर बोलतो. चारठाणकर साहेब यांनी याबाबत सांगावे. अशी घटना घडत नाही का?

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** ओढे नाले अतिक्रमण बाबत मा.आयुक्त साहेब यांनी प्रेझेंटेशन बाबत सांगीतले आहे. आपल्याकडे 20 पैकी 9 नाले प्रत्यक्ष जागेवर आहेत. परंतु गांव नकाशावर नाहीत. रेकॉर्डवर दुरुस्तीचा अधिकार भुमि अभिलेख विभागाला आहे. टी.पी.स्कीम नंबर 3 व 4 पलिकडचा रस्ता लहान दर्शविला आहे यात चूक कोणाची नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ओढया नाल्यावर ले आउट मंजूर केला का. ओढया नाल्यावर पाईप टाकले का ? टीपीत भ्रष्टाचार चालला आहे की नाही याबाबत सांगा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** लेआऊट यापुर्वी पासुन मंजूर आहे. एमआरटीपी अँक्ट नुसार कारवाई केली जाईल. प्रत्येक बंगला बांधकाम परवानगी तपासणी केली जाईल. भ्रष्टाचाराची चर्चा वर्षानुवर्षे चालू आहे. शासनाने बांधकाम परवानगी मंजूरीसाठी ऑन लाईन प्रक्रीया चालू केली आहे. एमआरटीपी अँक्ट मध्ये 60 दिवसात परवानगी मिळाली नाहीतर डीम परवानगी मिळते. किंवा काही त्रुटी असल्यास अर्ज दार यांना त्याची पुर्तता करणे संदर्भात मुदतीत कळविले जाते. नगररचना विभाग हा तांत्रिक आहे. या विभागात आठ पदे कमी आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पैसे घेतले की नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** बांधकाम परवानगी साठी ऑफिस मध्ये येण्याची गरज नाही. तुम्ही जर कोणी पैसे घेतले त्यांची नांवे सांगीतले तर त्यांचेवर कारवाई करु.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** नगररचना विभागातील ऑनलाईन फाईल सबमिट करणारे इंजिनियर फाईल ऑनलाईन सबमीट करुन देत नाहीत. व ते नगरसेवकांकडे जावू नका असे सांगतात.

**मा.श्री.मदन आढाव :** कंम्प्लीशनसाठी युनिट मागे पाच हजार रुपये घेतले जातात.

**मा.श्री.संपत बारस्कर :** एक गुंठयाचे घर बांधकाम परवानगी साठी पैसे घेतात की नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** एखादे प्रकरण मुदतीत केले नाहीतर मला डायरेक्ट भेटा. याबाबतीत जाहीर प्रकटण मी विभागात प्रसिध्द केले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** नगररचना विभागाची चौकशी लावा सभागृहात तसे रुलिंग द्या नगर शहराचा आपण विचार केला पाहीजे. ओढयावर प्लॉट मंजूर केला नसेल तर आम्ही राजीनामा देतो. यात जर तथ्या आढळले तर तुम्ही राजीनामा द्या.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :** चारठाणकर साहेब तुमच्या कालखंडात ले आऊट मंजूर झाला नाही का.

**मा.श्री.संपत बारस्कर :** इथापे साहेबांना घेवून तीन चार वर्षापासुन पाहणी करतोय. त्यांनी पुढे काय केले ते सांगावे. तुम्ही तेवढे जबाबदार आहात. यापूर्वी आपण सर्वांनी पाहणी केली त्याचे काय झाले?

**मा.शहर अभियंता श्री.इथापे :** तीन वर्षापुवी मायकलवार साहेब आयुक्त असतांना शिरसाठ मळा बालाजी कॉलनी येथे आतमध्ये निखिल वारे यांनी आयुक्त यांना मोटार सायकलवर बसुन पाहणीसाठी नेले. ज्या ज्या वेळी तक्रारी प्राप्त झाल्या त्या बाबतीत मी पाहणी केली व अहवाल सादर केला आहे. शिरसाठमळा भगवान बाबा चौकात तीन पाईप काढले. पिंपळगांव रस्त्यापर्यंत ओढयाचे अस्तित्वच नाही. गावडे मळया पर्यंत ओढा राहीलेला नाही. दोन ठिकाणी अडचणी आहेत. पिंपळे वस्तीतुन ओढा सुर्यनगर पर्यंत मिळतो मा.आयुक्तांच्या मान्यतेने खुला करुन दिला आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** आपण ज्यावेळी जावून आलो त्या ठिकाणी ओढे नाले मोकळे केले का? प्रत्येक वेळेस नविन आयुक्त येतात थोडे थांबा करतो म्हणतात नगर शहराचा प्रश्न आहे. जोपर्यत भ्रष्टाचाराची चौकशी लागत नाही तोपर्यत सभागृह चालू देणार नाही. इथापे साहेबांकडे कोणता चार्ज आहे.

**शहर अभियंता श्री.इथापे :** सध्या शहर अभियंता म्हणून कामकाज पहात आहे. नगररचना विभागाकडील 500 स्क्वे फुटापर्यंत बांधकाम परवानगी व रेखांकन स्क्रुटीनी करुन आयुक्त साहेबांकडे सादर करणे चे काम आहे. परंतु आतापर्यंत एकही फाईल माझेकडे आलेली नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :** प्रत्येक नगरसेवकाला विचारा तुमच्या वॉर्डात ओढया नाल्याची काय परिस्थिती आहे. कुमार भाउंच्या वॉर्डातील तलाव दरवेळी दिसतो. आम्हाला या सगळया विषयांवर निर्णय पाहीजे अगोदर कारवाई करा. वाटल्यास आजची सभा तहकुब करा व उद्या बोलवा. आमच्या विषयावर रुलिंग द्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :** स्थायी समिती सभेमध्ये ओढया नाल्याचे साफसफाई बाबत सगळयांनी म्हणणे मांडले. यावर अधिकारी एकमेकाकडे बोट दाखवतात. माझ्या प्रभागात काही ठिकाणी तीन तीन फुट घरामध्ये पाणी साठले होते. काहींची औषधे भिजली. धान्य भिजले, किमती वस्तु भिजल्या, पाण्या सोबत साप विंचू घरात आले. मी स्थायी समितीतही याबाबत बोललो. गणेश चौक ते सीना नदी पर्यंतचा ओढा आपण साफ केला असे उत्तर अधिका-याने स्थायी समितीमध्ये दिले. परंतु त्याठिकाणी ओढाच अस्तित्वात नाही. सिमेंट कॉक्रींटचा रस्ता आहे.

**इंजिनिअर श्री.सातपुते आर.जी. :** एक दीड फुटाची नाली त्या ठिकाणी आहे. झालेल्या कामाचे नांव घेतलेले नाही. त्यावेळी आपत्कालीन पुस्तकातील नांव घेतले. पुर्वी ओढा होता हे मान्य आहे. साफ केले म्हणून दाखवतात.

**प्रभाग अधिकारी श्री.सारसर :** ओढा त्या ठिकाणी नाही आर.सी.सी.रोड आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** राघवेंद्र स्वामी मंदीर बोल्हेगांव गावठाण पितळे कॉलनी ही ठिकाणे पाणी साठणारी आहेत. त्याठिकाणी 25 फुट ओढा होता आता अर्धा ओढाही शिल्लक नाही. मला ओढा चार फुट उपलब्ध करुन द्या. यावर आपल्या अधिका-यांचे म्हणणे आहे मोजणी खात्यात पैसे भरुन मोजणी करावील लागेल. तो ओढा जर पाच फुट केला तर प्रश्नच येणार नाही. गणेश चौकात दरवर्षी अडचण येते. पृथ्वीवरील पडलेले पाणी पाणतासने जाते त्याला म्हणतात ओढा. चार पाच ओढे मिळुन बनते नदी. माझ्या भागातील ओढे साफ करुन द्या. त्या ठिकाणी आता घर बांधले आहे त्यांनी बांधकाम परवानगी घेतली आहे. मग आता ते पाडायचे कसे. लोकांची घरपट्टी पाणी पट्टी घेतो त्यातुन ओढे साफ करा. गणेश चौक ते नदीपर्यंत ओढा साफ केल्याचे दाखवले मग ते पैसे कोणी खाल्ले. टेंडर प्रशासन करते. लोकप्रतिनिधीवर जबाबदारी टाकू नये. माझ्या प्रभागात पिण्याची पाईप लाईन लिकेज झाली. निम्या वॉर्डाला पिण्याचे पाणी मिळत नाही. याबाबतीत सातपुते यांना फोन केला. लाईन किती दिवसात निट व्हायला पाहीजे. वॉलमन नागरिकांना सांगतात नगरसेवकांना बोलावून घ्या. तुमचे काम आमच्या माथी मारु नका.

**इंजिनिअर श्री.सातपुते आर.जी. :** शेतकरी काम करु देत नाहीत.

**मा.श्री.कुमार वाकळे :** पाईपलाईनचेही पैसे घेतात. आपले लोक जाणुनबुजून नांव लावून घेत नाहीत. नंतर सेटलमेंट करतात. प्लेगची साथ आली होती त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी बोल्हेगांव वसवले आहे. वॉलचे डायरेक्शन बदलले त्यामुळे पाणी येत नाही ओपनस्पेस भरत नाही. लेआऊटमधील ओपन स्पेस आपल्या ताब्यात आला नाही मग आपण मंजुरी कशी देतो?

**इंजिनियर श्री.पारखी :** गावठाणला बौध्द वस्तीकडे जाणारा रस्ता प्रस्तावित करायचा ले आउट मधला ओपन स्पेस आहे. गाव आधी वसले आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** जागा भरत नाही म्हणुन बौध्द वस्तीला टाकायचे. बोल्हेगावचा उतारा नाही. भविष्यात अतिक्रमण मध्ये बौध्द वस्ती येईल. प्लॉट धारक व गावठाण मधील नागरिकांमध्ये वाद होतील. ओपन स्पेस प्रत्यक्ष ताब्यात घेतल्या शिवाय मंजूरी देवू नका माझे वॉर्डात मोठा ले आउट आहे त्यात असंख्य चूका आहेत. गोरगरीबांनी त्या ठिकाणी बांधकाम केले आहे. मी एका मोबाईल टॉवरचे परवानगी साठी नगररचना विभागात गेलो त्यावेळी परवानगी देता येत नाही असे सांगीतले. नंतर मात्र त्याठिकाणी मोबाईल टॉवरला

परवानगी मिळाली. जे असेल ते म्हणजे आर्थिक देवाणघेवाण करुन मंजूरी घेतली. आम्ही गेलो त्यावेळेला का मंजूरी दिली नाही. अतिक्रमणाची तक्रार केली तर संबंधिताला आपले कर्मचारी आमचे नाव सांगतात किती दिवस हे चालणार. आम्हाला दरवेळी निवडणूकीत मत मागायला जायचे आहे. अधिकारी काय तीन वर्षे राहणार 18 मीटर रस्त्यामधुन चार मीटर कट करा. मग कोणाची अडचण येणार नाही. 80 घरांसाठी 6 इंची लाईन टाकली आहे. काही ठिकाणी रस्ता 15 मीटर रोड 12 मीटर भरतो. 9 मीटरचा 6 मीटर भरतो. लोकांना शिस्त लावण्याचे काम प्रशासनाचे आहे.

**मा.श्री.मदन आढाव :** राघवेंद्र स्वामी मंदिराजवळचा रोड महानगरपालिकेचा आहे. 18 मीटर मोजा चारी खोदून द्या आपले कर्मचारी 10 वेळेस तेथे गेले. तेथे महिला अडथळा आणतात असे सांगतात. अडथळा करणा-यांवर गुन्हे दाखल केले पाहीजे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** मला माझे प्रभागातील ओढे नाले मोकळे करुन पाहीजे कसे करायचे ते करा. जे वाचवता येतील ते वाचवा. या शहराला कोणी वाली आहे की नाही. एकाने एन ए रोड बंद केला. माझ्या पध्दतीने मी उपाययोजना केली व रोड चालू केला. मी प्रभाग अधिकारी यांना सांगीतले अर्जुन जाधव यांना सांगीतले. पण त्यांचेकडून कार्यवाही झाली नाही. आता जे नविन रोड होतील त्याची मार्कींग ठेवा. ओपन स्पेसचे पैसे भरले तर ओपन स्पेस मोजणेची गरज नाही. ओपन स्पेस ठेवावाच लागेल हा सभागृहामध्ये निर्णय घ्या. भारत बेकरी जवळील ओपन स्पेस आपला आहे. आपले डिपार्टमेंट म्हणते आर्धी बिल्डींग अतिक्रमणात आहे. प्रत्येक गोष्ट अॅडजेसमेंट करुन केली जाते. उद्या एखादा अधिकारी सही करुन गेला व लेआउट मंजूर केला तर दुरुस्त करता येणार नाही. आमच्या प्रभागातील पाईपलाईन चालू झाली नाही तर शहरातले पाणी तोडू. उद्या या ठिकाणी जर एखादा खून झाला तर त्याला जबाबदार कोण? दोन दिवसापुर्वीचे पावसामध्ये 5 पंप बंद होते. मिसाळ यांनी दोन पंप आणले. आमची ओपन स्पेस आम्हाला मोजून द्या. नजराणा फी भरुन ओपन स्पेस रद्द करायची ही पध्दत बंद करा. महानगरपालिकेचा ठराव करुन राज्य शासनास पाठवा अशी मी विनंती करतो.

**मा.श्रीमती.ढोणे मालन :** महानगरपालिकेची विविध विकास कामे ठेकेदार घेतात. ती कामे चार चार वर्षे अपूर्ण ठेवतात. पहीले काम अपुर्ण असतांना तेच ठेकेदार पुन्हा नविन कामे घेतात. पहिली कामे अपुर्ण असतांना त्यांना नविन कामे देताच कसे मी या बाबतीत दिनांक 19 /4/22 08082022 रोजी पत्र दिले आहे.

**शहर अभियंता श्री.इथापे :** ठेकेदार वेळेत कामे पूर्ण करीत नाहीत. याबाबतची आपली दोन पत्र मिळाली. आम्ही मागील मंजूर कामांचा दिवाळी पासून मार्च एण्ड पर्यंत कामाचा आढावा घेवून मार्च एण्ड व मे पर्यंत काही कामे पूर्ण केली. काही ठिकाणी तांत्रिक अडचणी

मुळे कामे अपुर्ण आहेत. आपल्या प्रभागात दोन तीन कॉक्रीटची कामे अपुर्ण आहेत. ज्या ठिकाणी अडचण नाही व काम केले नाही अशा ठेकेदारांना 1 टक्का दंड आकारला आहे. अपुर्ण कामांच्या बाबतीत प्रथम नोटीस देवून नंतर दंड आकारुनही काम केले नाही तर ब्लॅक लिस्टची कारवाई करण्यांत येते. एक कॉन्ट्रॅक्टर ब्लॅक लिस्ट केला आहे.

**मा.श्रीमती.ढोणे मालन :** घरपट्टी मोजणी साठी कर्मचारी मोजमाप घेतात. प्रभाग अधिकारी भेटायला बोलावतात. एका समाजाचे लोक टार्गेट करतात. प्रमाणपत्र असले तरी अतिक्रमण आहे असे म्हणतात.

**प्रभाग अधिकारी श्री.राकेश कोतकर :** त्या भागातील वसुली लिपीक मदतनीस नंदा भिंगारदिवे आहेत. महानगरपालिके तर्फे अनधिकृत नळ कनेक्शन रेग्युलर करणेसाठी मोहीम राबविण्याचे आदेश असल्याने त्यासाठी कागदपत्रांची मागणी केली जाते. तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांची इतर वॉर्डात बदली केली आहे. त्यांना समज दिली आहे. त्यांनी माफी मागीतली आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** शहरामध्ये किती नाले आहेत त्याची काय परिस्थिती आहे.

**इंजिनिअर श्री.आर.जी.सातपुते :** अतिक्रमण विभागा मार्फत नाले सफाईचे काम केले जाते. जेथे मशीन जावू शकते तेथे काम केले जाते. ओढे किंवा नाले ब-याचशा अंतरावर पाईप टाकले आहेत. वॉटर लिंकिंग झाले आहे. जिथे पाणी घुसते त्या ठिकाणी पाहणी केली. अभियंता कॉलनी नरहरी नगर हा भाग पाहीला मधल्या भागात पाईप टाकले. त्याठिकाणी पाईपलाईनच्या तोंडाला प्लॅस्टीक जमा होतेत्यामुळे प्रवाह आडतो. नाला तुंबल्यामुळे पाणी थांबले असे नाही.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** छोटया नाल्या साफसफाई न झाल्यामुळे ही परिस्थीत उद्भवली. कुठले साफ केले कुठले राहीले याची माहिती द्या.

**डॉ.शेडाळे, घनकचराव्यवस्थापन विभाग प्रमुख :** छोटे नाले मनुष्यबळाव्दारे साफ केले त्याची संख्या सांगता येत नाही.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** अजुनही छोटया नाल्या साफ झाल्या नाहीत त्यामुळे ही परिस्थीती उद्भवली आहे.

**डॉ.शेडाळे घनकचराव्यवस्थापन विभाग प्रमुख :** 100 टक्के नाले सफाई झाली आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** खोटी माहिती देवू नका सभागृहाची दिशाभूल करु नका. ते जर दिशाभुल करीत असतील तर त्यांचेवर कारवाई करा.

**डॉ.शेडाळे घनकचराव्यवस्थापन विभाग प्रमुख :** या कामाची टेंडर प्रोसेस झालेली आहे परंतु वर्क ऑर्डर दिलेली नाही.

**मा.सौ.रुपाली वारे :** परवाच्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये 100 टक्के काम झाले असे तुम्ही सांगीतले. चार दिवसापासुन काम बंद आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** वस्तुस्थिती सांगा.

**डॉ.शेडाळे घनकचराव्यवस्थापन विभाग प्रमुख :** सदर कामाचे टेंडर झाले परंतु वर्क ऑर्डर झाली नाही. तत्कालीन आयुक्त व तत्कालीन घनकचरा प्रमुख श्री.के.के.देशमुख यांनी ठेकेदाराला काम सुरु करायला सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दिनांक 30 मे रोजी नाले सफाई सुरु झाली. सगळयांचे लेखी रिपोर्ट आले काम पूर्ण झाल्याचे त्यामुळे काम बंद केलेले आहे असे सांगीतले.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** नाला 100 मीटर दाखवतात. मधला भाग कोठेही साफसफाई होत नाही. मोजणी करतांना 100 मीटर धरले जाते. पण काम करतांना 20 30 मीटर केले जाते. तुम्ही अगोदर टेंडर प्रक्रीया का करीत नाही. आयुक्त साहेबांनी यात लक्ष घालावे नगरकरांना आपलेकडून खूप अपेक्षा आहेत.

**मा.सौ.रुपाली वारे :** ठिकठिकाणी पाणी घरात घुसते. एखादा व्यक्ती जर पाण्यात वाहून गेला तर याला जबाबदार कोण.

**मा.श्री.त्र्यंबके सुनिल :** आपल्या शहरामध्ये गॅस पाईप लाईनचे काम चालू आहे. पावसाळ्यात सुध्दा काम चालू आहे. आमच्या प्रभागात घरासमोरील या खोदकामामुळे नागरीक घराबाहेर पडू शकत नाहीत. पावसाळयात काम का चालू केले. रस्ते खोदकामामुळे खराब झालेले आहेत. ते दुरुस्त कसे करणार. खोदाईचे पैसे किती भरले. वॉर्डाचे भरले का पुर्ण शहराचे भरले.

**शहर अभियंता श्री.इथापे :** भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड या कंपनी मार्फत देशात घरोघर गॅस पुरवठा करण्याची केंद्र सरकारची योजना आहे. तत्कालीन आयुक्त साहेब यांनी बैठक घेवून प्रस्ताव तयार केला. त्या विभागाकडून पाठपुरावा होत होता. रक्कम मुदतीत खर्च करणे अभिप्रेत होते. प्रायोगिक तत्वावर वॉर्ड नंबर 1,2,4 व 5 या प्रभागात परवानगी दिली. तेथील जे अनुभव येतील त्यानंतर पूर्ण शहरात परवानगी देवू असे ठरले. 7 कोटी 85 लाख अंडर ग्राउंड पाईपलाईन टाकणेसाठी परवानगी दिली आहे. 6 मीटर रस्त्याच्या कच्या बाजुला खोदकाम करुन त्यांनी पाईप लाईन टाकल्या पाहीजेत.

**मा.श्री.त्र्यंबके सुनिल :** नविन रस्ते त्यांनी फोडले आहेत. सुर्यनगरमध्ये खोदकाम केल्यामुळे चिखलातून मुलगा शाळेतही जावू शकत नाही.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :** महानगरपालिकेने त्यांना लाईन आउट करुन दिलेले नाही. आमच्या वॉर्डात पैसे भरले त्यामुळे आमच्या वॉर्डातच हे पैसे खर्च झाले पाहीजे. महासभेत यावर निर्णय घ्यावा. पैसे इतर वॉर्डात देता कामा नये. जिथले रस्ते खोदले तिथले रस्ते

दुरुस्त झाले पाहीजेत.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे** : यापुर्वी कशा प्रकारे पैसे वापरले जायचे त्याबाबत माहिती द्या.

**मा.श्री.संपत बारस्कर** : सीटी प्राईड हॉटेल ते राजनंदिनी हॉटेल अंतर्गत भागातील रस्त्यासाठी आयुक्तांकडे आम्ही मागणी करुन थकुन गेलो.

**शहर अभियंता श्री.इथापे** : पहिल्यांदा प्रोजेक्ट शहरात आला. खाजगी कंपन्यांकडून पैसे डिपॉझिट करुन ठेवायचे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले** : ज्या चार वॉर्डात पैसे भरुन घेतले तेथेच काम व्हायला पाहीजे. या कामासाठी एक मीटर रस्ता फोडला. तेवढे पैसे भरुन घेतो. सर्व रस्त्याचे पैसे भरुन घेत नाही. जिथले रस्ते खोदले तिथेच पॅचींग होते.

**मा.श्री.संपत बारस्कर** : जिथे महत्वाचे आहे तेच रस्ते घ्या.

**मा.श्री.पाअ्ुलबुधे विनीत** : गुलमोहोर रोड या कामाचा आमच्या वॉर्डात सरमिसळ करु नका.

**मा.श्री.संपत बारस्कर** : रस्ते करतांना मिळालेल्या निधीतुन थोडे आमच्या प्रभागाला द्या.

**मा.श्री.मनोज कोतकर** : केडगावात ७-८ जि.प. शाळा आहेत.

**मा.श्री.गणेश कवडे** : सर्व नगरसेवकांना विनंती आहे की, मा. महापोर मॅडम ज्यांना परवानगी देतील त्यांनीच बोलावे.

**मा.श्री.रामदास आंधळे:** अहमदनगर शहराचे नाव जिजाउ नगर करण्यात यावे.

**मा.डॉ.सागर बोरुडे:** उपायुक्त आपले घर उचलुन घ्या म्हणतात. गावडे मळ्यात पुर्णपणे पाणी शिरते.हे लोक अशा पध्दतीने उत्तर देत असतील तर याचा खुलासा करावा. दिवस रात्र आम्ही पाण्यात उभे आहोत.नागरिकांच्या रोषाला आम्हाला सामोरे जावे लागते.

**मा.आयुक्त साहेब:** या सखल भागात पाणी शिरत असल्याने बांधकाम परवानगी दिली आहे. उपायोजना प्रशासनाकडुन केल्या जातील.चुकीचे ले-आउट झाले पाईप टाकले. जवळपास १४ ठीकाणं आहेत.

**मा.उपमहापोर श्री.गणेश भोसले** : आपण काही करत नाही तर असे अधिका-यांनी बोलु नये.

**मा.डॉ.सागर बोरुडे:-** तत्कालीन आयुक्त यांनी समिती नेमली बाबत इथापे यांनी सांगीतले त्या अहवालावर मी कारवाई करेन  असे सांगीतले त्या अधिकारा-यावर काय कारवाई करणार ते सांगा. ते म्हणतात प्लींथ वाढवा. त्यांना लेखी द्या.व त्या नंतर त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.आयुक्त साहेब** : संबधीत उपायुक्त याचे कडुन खुलासा मागविण्यात येईल व त्यानंतर कारवाई प्रस्तावीत करु

**.मा.डॉं.सागर बोरुडे:** पिंपळगाव माळवी येथील वृक्षतोडीवर कोणतीही कारवाई झाली नाही. सगळे नगरसेवक झाड लावण्यासाठी आयुष्य खर्च करतात.प्रशासन कुठेही गांभीर्याने घेत नाही. याच्यावर तुम्ही काय करणार शेकडो झाडे तोडली नजन यांचे अंगावर लोकं धावुन आले.

**उद्यान अधिक्षक श्री.नजन :** पिंपळगाव माळवी येथे १२२ वृक्षांची तोड झाली आहे. २५/०५/२०२२ रोजी MIDC पोलीस स्टेशन.मध्ये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीस अटक झाली व जामीन मंजुर झाला आहे.वृक्ष प्राधीकरणाचे नियम अर्जात नमुद केले आहे.

**.मा.डॉं.सागर बोरुडे :** इथुन पुढे समिती नेमतान ४-५ लोकांना नेमा. पिंपळगाव पंपिंग स्टेशन मधील पाईप चोरीला गेले.एकही वॉचमन नाही.तेथील सामग्री चोरीला गेली.

**इंजिनिअर श्री.सातपुते आर.जी. :** एम आय डी सी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

**मा.डॉं.सागर बोरुडे:** लाखो रुपयांची चोरी झाली तेथे वॉचमनची नेमणुक केलेली नाही.

**इंजिनिअर श्री.सातपुते आर.जी. :** यापुर्वी 2 वर्षापुर्वी वॉचमन होता. आस्थापनाला रिपोर्ट दिला आहे.

**मा.आयुक्त साहेब :** पिंपळगाव माळवीच्या ठिकाणी कॉंट्रक्ट बेसिसवर वॉचमन नेमणुक २४ तास वॉचमन उपलब्ध देण्याचे आदेश देत आहेत.

**मा.श्री.मनोज कोतकर :** या सभेत झालेले विषय पुढच्या सभेत येवु नये. याची आयुक्त साहेबांनी याची काळजी घ्यावी. पुढच्या पावसाळ्यात जर असे घडत असेल तर त्याला सस्पेंड करायची जबाबदारी तुमची राहील.आमच्या अडचणी आहेत. सगळे अधिकार तुमच्या हातात आहे. अधिकाराचा वापर झाला पाहीजे. नागरीक प्रश्न विचारतात. तुमच्या भागात नगरसेवक कोण आहे.उत्पनाचा स्त्रोत नसेल तर असे कुठ पर्यत चालेल. जि.प.च्या ७-८ शाळा आहेत. गेल्या २-३ वर्षापासुन मी पाठ पुरावा करतो. निबोंडीसारखी घटना घडल्यावर बोध घेणार का? शाळा जि.प.ची व जागा महानगर पालिकेची शाळा पडायला लागल्या आहेत. जि.प. मध्येही मी तीन चार वेळेस गेलो होतो.चारठाणकर साहेब होते मी नेउन शाळा दाखवली. शाळा चालवायच्या नसतील तर बंद करुन टाका. आधी ती शाळा चालु झाली पाहीजे.जि.प. च्या शाळेत अधिकारी नेमुन त्यांचेकडुन निधी कसा मिळेल यासाठी मिटींगा लावा. पालिकेच्या शाळा ह्या बंद पडायला लागल्या त्या बंद करा. व ते शिक्षण विभागाकडे वर्ग करा. स्टेशन रोडची शाळा चालु झाली पाहीजे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** शिक्षक दुसरीकडे वर्ग करा.चार ठिकाणच्या शाळा एकत्र आणा. चांगला विषय लक्षात आणला.

**मा.आयुक्त साहेब :** संपुर्ण विषय समजुन घेतो उपायुक्त दर्जाचा अधिकारी नेमतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :** आमच्या कडे टॅंकर कधी बंद होईल?

**मेकनिकल इंजिनिअर श्री.निकम :** प्रियंका कॉलनी, सुखकर्ता कॉलनी, अचानक वस्ती येथील पाणी प्रश्न उपस्थित केला. प्रियंका कॉलनी पाईपलाईन चोकअप आहे. इस्टीमेट केले आहे. अचानक वस्ती ईस्टीमेट केले आहे.....सुखकर्ता कॉलनी ४-८ दिवसात मार्गी लावतो.

**मा.सौ.पल्लवी जाधव :** प्रभाग क्रमांक ६ मध्ये सावेडी गावात प्रत्येक ओढे नाले स्वछ होत नाही. माझ्याच वॉर्डातील जेष्ठ नागरिकांचे पत्र मला आले आहे.ते वाचन करुन दाखवते. नाला पुर्णपणे बुजविला आहे.चारठाणकरांना मी प्रश्न विचारला बिरोबा मंदीरा जवळील प्लॉट तुकडे बंदी करुन मंजुर केले. कुष्ठधाम जवळील ओढा बुजविला. त्यामुळे लोकांच्या घरात पाणी शिरले.....

**नगररचनाकार श्री चारठाणकर :-** ग्रीन झोनच्या लेआउटला महानगर पालिकेकडुन अंतिम मंजुरी दिली आहे. अतिक्रमण विभागास पत्र दिले आहे. रजिस्टर विभाग व डी डी आरला कळविले आहे. तलाठ्यांना पत्र दिले आहे.

**मा.सौ.पल्लवी जाधव :** वाघ मळ्यातील ओढे साफ केले नाही.अतिक्रमण काढुन टाका मोजणी करुन घ्या.

**मा.श्री.योगीराज गाडे :** प्रभाग २०१९ पासुन तेच तेच पासुन विषय रिपीट होतात. अधिकारी उत्तर देत नाही. पंतप्रधान कार्यालयाला वेड्यात काढले. माजी महापौर, खासदार यांनी या ठिकाणी व्हिजीट दिल्या पाहिजे. २०१९ ला तक्रार केली, फोटो जोडले महानगर पालिकेने असे उत्तर दिले की आम्ही ती तक्रार निकाली काढली.संबधीताचे समाधान झाले.२९ डिसेंबर 2021 पंतप्रधान कार्यालयाला उत्तर दिले. मला तर पत्रच आले नाही.मागच्या महिन्यात पंतप्रधान कार्यालयातुन फोन आला.महानगरपालिकेच्या कारभारस पुअर रेटिंग दिले.मी ते पत्र पत्रकारांना देतो. पिंपळगाव येथील 300 च्या वर झाडे तोडली. संबधीताला रु.पाच हजार दंड होवु शकतो असे महानगरपालिकेने कलम लावले याचा अर्थ महानगरपालिकेच्या अधिका-यांचे सेटलमेंट झाले नाही असे वाटते. सरकारी कामात अडथळा आणण्याचे कलम लावायला पाहिजे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** प्रभाग ओढ्या नाल्या संदर्भात अनेकांनी चर्चा उपस्थित केली. गट नं. ६/२ , १२/२ खोकर नाल्याला जोडुन हा गट नं आहे.मी माहितीच्या अधिकारात या स.नं ला परवानगी कशी दिली त्या ठिकाणी आजुबाजुला शेती आहे. खोकर नाल्याचा पुल मोकळा आहे. त्यावर पुल बांधला प्रायोगिक स्वरुपात मंजुरी दिली 3 एकर जमीन आहे. त्या ठिकाणी

जायला जागा नाही म्हणुन बिल्डरने त्यावर पुल बांधला त्या पुलाला देखिल टी.पी बांधकामाची परवानगी नाही. लेआउट कसा मंजुर केला आजपर्यंत मला उत्तर आले नाही.मला अपील करायचे होते.याठिकाणी जायला रस्ता नाही त्या ठिकाणी लेआउट मंजुर करता. तो पुल पाडला तर जाणार कसं? नगररचना विभागाने लेआउट मंजुर कसा केला? याबाबत माहिती दिली नाही. खोकर नाल्यावरील पुल बांधला त्याला कुठलीही परवानगी नाही. तो पुल पाडण्यात यावा.

**शहर अभियंता श्री.इथापे :** आमच्याकडे आपण विचारणा केली आम्ही आपल्याला कळवले. बांधकाम विभागाने परवानगी दिली नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :** भविष्यात जर त्या पुलावरुन वाहतुक करताना जर तो पडला व जिवित हानी झाली तर त्याला जबाबदार कोण? त्याला चिटकुन शेत जमिन आहे.पुल बांधण्याचे एवढे धाडस करतो कसा त्याची कोणतीही परवानगी नाही.त्या पुलाच काय करणार? याचे रुलिंग द्या. दोन दिवसात तो पुल पाडला पाहीजे.

**मा.महापौर मॅडम :**आपण चॉकशी करु.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** पुलाला परवानगी बांधकाम विभागाने दिलेली नाही.पुल नगर रचना व अतिक्रमण विभागाने कारवाई करणे अपेक्षित आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** नाल्यातुन पाईप तात्काळ काढायला सांगितले आहे. परवा माझा अहवाल जाईल.मा. महापौर, उपमहापौर, मा. आयुक्त साहेब याच्या कडे जाईल त्यांचे आदेशानुसार पुढील कारवाई करु.

**मा.महापौर मॅडम :**आपण याच वर्षात कामाचे बीलं काढु 10 लाख रु. ची बीलं निघतील.

**मा.श्री.शाम नळकांडे :** कल्याण रोड, वारुळाचा मारुती परिसरात पुर परिस्थीतीची व्हिजीट केली. आपत्कालीन परिस्थीतीत आपली टिम काय काम करते. साधन सामग्री काय आहे? काय उपाययोजना करतात?

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :** आपत्कालीन विभाग कार्यरत आहे. अग्निशमन विभाग कार्यालय येथे हा विभाग कार्यरत आहे. लाईफ जॅकेट आहे. आपत्कालीन पुस्तीका तयार केले आहे. अग्नीशमन विभागात व प्रभाग अधिकारी यांचेकडे ज्या ज्या तक्रारी आल्या त्याठिकाणी आधी पोहोचलो. 6 पंप आहेत. 5 चालू आहेत.काल परवा तात्काळ दुरुस्त करुन घेतले. कल्याण रोड वाहतुकीसाठी पुर्ण बंद होता. त्याठिकाणी बॅरेकेटींग का नाही लावले. वारुळचा मारुती पुलाला बॅरेकेटींग नाही लावले.तुमच्याकडे तक्रार प्राप्त झाली नाही तोपर्यंत कारवाई करायची नाही का? आयुक्त साहेब आले त्यावेळी तिथे कोणी ही उपस्थीत नव्हते. बॅरेकेट्च्या पोलीस प्रशासनाला सुचना दिल्या यापुढे दक्षता घेतली जाईल.

**मा.श्री.शाम नळकांडे :** आपत्कालीन साठी किती खर्च झाला?

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** प्रभाग अधिकारी यांना ५० हजारांचे खर्चाचे अधिकार दिले आहेत.

**मा.श्री.आसिफ सुलतान** : प्रभाग अधिकारी यांनी जे.सी.बी. मागीतले तर तो निधी नाही म्हणतो.

**मा.श्री.शाम नळकांडे :** दिशा दर्शक खांब लावण्याची गरज आहे. पोलीस प्रशासनाची मदत घ्या.घटना होण्यापूर्वी काळजी घ्या. घटना होण्याची वाट पाहु नका.आपली आपत्कालीन टीम तयार ठेवा. आगामी 5 दिवसात पावसाचा अंदाज वर्तविला आहे. अग्निशमन विभागात कर्मचारी भरायला सांगतो. 2 वर्ष झाले हा प्रश्न मी सभेत मांडत आहे.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** 2- 3 वर्ष झाले टेंडर काढतो कोणी प्रतिसाद देत नाही.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे:** आपले अग्निशमन इतके चांगले आहे की महानगर पालिकेची ऐतिहासिक वास्तु जळाली ती आपण वाचवु शकली नाही. बंब चालु होत नाही म्हणुन बादलीने पाणी टाकत होतो. अग्निशमन विभागाला किती बळी अपेक्षीत आहेत त्यानंतर अग्निशमन दल सक्षम करणार.

**मा.श्री.अनिल शिंदे** : शासनाने वेतन वाढ द्यायचे घोषित केले आहे. आस्थापनाने प्रस्ताव सादर केला का?

**मा.अतिरिक्त आयुक्त श्री.पठारे :-** वार्षिक वेतनवाढीचा प्रस्ताव प्रशासनाकडे प्राप्त झालेला आहे.उपायुक्त बाहेर गावी असल्याने मी माझी स्वाक्षरी करुन दिली आहे आता होईल.

**मा.सौ.बोरुडे पुष्पा :**महिला बाल कल्याण समितीचा निधी 5 % निधी कॅश स्वरुपात नसल्यामुळे मी काम करु शकत नाही. सदस्यांची माझ्याकडे मागणी होते. ओपन जिम, बाकडे बसविणे.महानगर पालिकेकडे 13 शाळा आहेत. इमारती पत्रा शेडमध्ये आहे. काही ठिकाणी लाईट नाही, फॅन नाही, कोणी अधिकारी उपस्थीत रहात नाही, ठेकेदारांची बीले निघत नाही मग त्यामुळे ते कामं करत नाही.

**मा.श्री.शाम नळकांडे : -** महिला बाल कल्याण निधी कॅश करण्यात यावा. नगरसेवक निधी कॅश नाही तो रदद् करा मग मी त्यातुन काम करु शकत नाही.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** त्यांनी जी मागणी केली ती वस्तुस्थिती आहे.

**मा.आयुक्त साहेब :** महिला बाल कल्याणसाठी एकुण बजेट 25 % निधी राखुन ठेवतो. महानगर पालिकेचे उत्पन्न घरपट्टीचे आहे.31 ऑगस्ट पर्यत शास्ती माफी योजना लागु केली आहे. 2 कोटी करत शास्ती रक्क्म झाली ती काही रक्कम जमा होईल त्यानुसार पुढील

नियोजन कोणताही रोख स्वरुपात निधी नसतो. येणारे उत्पन्नातुन 5% राखीव ठेवण्याचा निधी राखुन ठेवुन महिला बाल कल्याणचे प्रस्ताव असतील ते सादर करावे.

**मा.श्री.पाअ ुलबुधे विनीत :** नगरसेवक निधीही रोख करा.जसे महिला बाल कल्याण समितीचे रुलींग दिले तसे रुलींग द्या.

**मा.आयुक्त साहेब :** मी तपासुन घेतो. सकरात्मक मार्ग काढतो.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** मुरुमाचा विषय संपवा. पावसाचे दिवस आहेत. त्या वर्षात बीलं निघेल याची व्यवस्था करा. काम पाहुन घ्या.

**मा.आयुक्त साहेब :** भरती प्रक्रीयांची संचीका मागवुन घेतो.जो राबविता येत असेल तर तो राबवु. साहित्य सामग्री 100% खरेदी केली जाईल. एका अधिका-याचे नेमणुकीचे आदेश दिले आहेत.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** सर्व सदस्यांनी कारभार महानगरपालिकेसमोर मांडला त्यातुन आपल्याला काही तरी आउटपुट मिळेल अशी अपेक्षा आहे. गावडे मळ्यात ब-याच घरामध्ये पाणी होतं. पुन्हा संसार चालु करणे सोपे नाही. गावडे मळ्यात साई स्कुल ओढ्यावर ज्यांनी केला त्याला मंजुरी कशी मिळाली.

**शहर अभियंता श्री.इथापे:-** गावडे मळ्यातील रस्ता बांधकाम विभागीने तयार केला नाही.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** तुम्ही कारवाई का करत नाही? रस्ता केला नाही म्हणता बिल्डरच्या सोईने रस्ता वळतो कसा?

**मा.आयुक्त साहेब :** M. R. T. P. च्या तरतुदीनुसार कारवाई करणार. DP मध्ये अस्तीत्वात असलेले नकाशे दाखवावे लागतील.

**मा.श्री.योगीराज गाडे:-** ऑनपेपर नाले गायब केले.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** तुम्ही साईट व्हीजीट करा.

**मा.श्री.पाअ ुलबुधे विनीत :** आता पाउस पडत आहे. ठोस कारवाई कुठेच होत नाही.

**मा.आयुक्त साहेब :** मी ठोस कारवाई करणार.

**मा.श्री.पाअ ुलबुधे विनीत :** गाडे साहेबांकडुन नकाशे प्राप्त करुन घेणेत यावेत रुलींग घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :** T P मधील अधिका-यांचे चॉकशीचे रुलींग द्या.

**मा.आयुक्त साहेब :** अस्तित्वातील नाले, बुजविण्यात आलेले नाले, पाईप टाकलेले नाले याबाबत प्रशासनाकडुन सविस्तर प्रस्ताव सादर करतो.मग त्यावर रुलींग देवु. उपाययोजनेसाठी समिती स्थापित करावी लागेल. त्यात रिटायर्ड नगररचनाकार याची समिती नेमु.

**मा.श्री.संपत बारस्कर :** मागे ज्या गोष्टी झाल्या त्याची चौकशी करा.

**मा.महापौर मँडम:-** रुलींग ..चौकशी करु.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** काम काजात पारदर्शकता ठेवा.आउटपुट मिळेल अशी अपेक्षा करतो.

**मा.सौ.रुपाली वारे :** नुकसानीचा सर्व्हे केला का?

**मा.आयुक्त साहेब:** लेआउट चुकीचा की बरोबर हे ठरलेले नाही. त्यामुळे सर्व्हे केला नाही.

**मा.सौ.रुपाली वारे:** शहारात सर्व्हे करावा. जास्तीत जास्त नुकसान झालेल्यांना 50 हजार व कमीत कमी नुकसान झालेल्यांना 10 हजार मदत जाहीर करावी.

**मा.महापौर मँडम:-** नुकसान भरपाईचे प्रस्ताव प्रशासनास पाठवुन देवु.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भासले :-** आयुक्त, उपायुक्त आम्ही व्हीजीट करु. तुम्ही बरोबर पाहीजे.

**मा.सौ.रुपाली वारे:** आमच्या वॉर्डात एखादे काम आपत्कालीन निधीत करु शकतो का? आम्हाला प्रत्येक वेळेला महापौरांचे लेटर आणायला सांगतात.

**मा.श्री.पाअुलबुधे विनीत :** छोट्या कामांसाठी निधी द्यायचे काम महापौर, उपमहापौर यांनी द्यायला पाहीजे नगरसेवकांना अधिकार नाही का? आपण ठराव विखंडीत करु शकतो.

**मा.आयुक्त साहेब** : कामाची तातडी पाहुन प्रस्ताव मंजुर करु.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** मुरुमाचे टेंडर संपले आहे. म्हसे ठेकेदार ब्लँकमेल करतो. पँनल करा.चार पाच जण ठेवा.

**विषय क्रमांक 1**

**मा.सौ.सुरेखा कदम :** बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात सोई सुविधा दिल्या जात नाही. दुस-या हॉस्पीटल मध्ये पाठविले जाते. दवाखान्यासाठी परत पाठविला असल्याचे समजते इतरत्र हलविण्याबाबत.

**मा. उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** 2 कोटी निधी मा. आमदार साहेबांनी नविन हॉस्पीटलसाठी आणला आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :** हॉस्पीटल तुम्ही बंद करणार का सोयी सुविधा देणार. मा. महापौर मँडम यांनी व्हीजीट दिली साईट्चे इस्टीमेट केले. या हॉस्पीट्ल ची सुधारणा झाली पाहीजे.क्रीटीकल पेशंट दुसरीकडे पाठवतात तिथं काय काय सुविधा देतात डॉक्टर तेथे उपलब्ध असतात का?

**वैद्यकीय आरोग्य अधिक्षक श्री.राजुरकर :** बाळासाहेब देशपांडे दवाखाना गेली 50 वर्षापेक्षा जास्त सेवा देत आहे. OPD , सोनोग्राफी, डिलीव्हरी, सिझेरीयन, जननी सुरक्षा सेवा अशा योजना अंतर्गत लोकांना सेवा देत आहोत. स्टाफची कमतरता आहे. 24 तास RMO

राहतात, तज्ञ 2 स्त्री डॉक़्टर कायम सेवेतील पेशंट्ला ICU ची सेवा लागत असेल असेच पेशंट सिव्हीलला शिफ्ट करतो. लहान मुलांचे ICU च्या केसेस सिव्हीलला शिफ्ट करावे लागतात.भुल तज्ञ उपलब्ध झाले नाही तर इतर ठिकाणी पेशंट पाठवतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :** बाळासाहेब दवाखाना तेथेच ठेवणार का इतरत्र हलवाणार ती सेवा बंद करणार का?

**वैद्यकीय आरोग्य अधिक्षक श्री.राजुरकर :** ती धोरणात्मक बाब आहे. मागील आर्थिक वर्षातील निधीतुन रु. ५ लाखाचे लॅब, किरकोळ दुरुस्ती केली आहे. वास्तु वापराच्या योग्य आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :** नविन वर्षात निधी ठेवायला पाहीजे होता.

**मा. उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** पुढच्या बजेट मध्ये तरतुद करु.

**मा.सौ.सुरेखा कदम :** हॉस्पीटल बंद करु नये. गोरगरिब रुग्णांना त्याचा लाभ होतो.जेव्हा नगरसेवक फोन करतात तेव्हा पेशंटला अँडमिट करुन घेतात तेथील सिस्टरांना तशा सुचना द्या.

**मा. महापौर मँडम:** कर्मचा-यांना सुचना देण्यात याव्यात.

**मा.सौ.सुरेखा कदम :** 10 कोटीतील कामाचे टेंडर मंजुर आहे पण अजुन वर्क ऑर्डर झाली नाही.

**शहर अभियंता श्री.इथापे:** राज्य शासनाने 10 कोटी महिला बाल कल्याण कडे त्याचे 3 टेंडर केले 17 ते 18% above गेल्याने उपनगरातील, शहरातील मध्य वस्तीचा भाग सोडून भुयारी गटार योजनेतील कामे सोडून पूर्ण केली.महापौर, उपमहापौर यांचे स्तरावर बॉठक घेउन मध्यम वस्तीतील कामे सुचविली. चितळे रोड, दिल्लीगेट,चौपाटी कारंजा ते पोखर्णा नारळवाला, जिल्हा नगर वाचनालय ते पटवर्धन चौक ते घुमरे गल्ली तीन रस्तांची नावे सांगीतली.संबधित ठेकेदार कडुन चितळे रोड केला पैसे वर्ग केले टेंडर तिकडचे रस्त्याखालची कामे करुन घेतली. ती कामे PWD कडे असल्याने त्यांचेकडे शिल्लक असलेल्या पैशातुन मी सांगीतलेले पाच रस्त्यांची कामे सुचविली व आजरोजी जे पैसे शिल्लक आहेत त्यातुन प्रायोरिटिने हे रस्ते करण्यात यावेत असे भाग आजही आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :** महासभेत विषय घ्या.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** पुढील वाढीव निधीसाठी प्रस्ताव महासभेत घ्यावा लागेल. गेल्या 2 महिन्यापासून PWD contractor, नगरसेवक ३- ४ वेळेस भेटले आहे.मागील निधीतुन काम करण्याची जबाबदरी PWD ची आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :** जेवढे निधी आहे तेवढे रस्ते दुरुस्तीचे आदेश द्या.खिस्तगल्लीतील नागरिकांना खराब पाणी येते. ते पाहून घ्या.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** पाणी पुरवठा व आम्ही एकत्रित शोध घेवू.

**मा.श्रीमती.सुनिता कोतकर :-** केडगावातील पँचींगची कामे करुन घ्यावीत.फवारणीची पावडर उपलब्ध करा.

**मा. महापौर मँडम:-** भ्रष्टाचाराचे बाबतीत समिती नेमा.

**विषय क्रमांक 3**

**मा.श्री.कुमार वाकळे** : एक तान्हे मुल त्यांना आहे. महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त मदत त्या महिलेला दिली पाहीजे. ते परप्रांतीय आहेत. त्यांची परिस्थीती अत्यंत वाईट आहे. चुकी कोणाची हे सांगता येत नाही. महानगर पालिकेच्या वतीने एक चांगला मेसेज जाईल. आताच त्यांनी घरासाठी लोन घेतेले. पण आता त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे त्यांना मदत होईल.प्र.क्र.6 मधील जो विषय आहे यासाठी मा. उपमहपौर, मा. आमदार या रस्तासाठी आग्रही होते. आण्णा भाउंचे काम फक्त मातंग समाजासाठी नाही तर कष्टकरी कर्मचा-यांचे कल्याण आण्णाभाउंनी केले होते. या रस्त्याला आण्णाभाउंचे नाव द्यावे ही विनंती करतो.

**वैद्यकीय आरोग्य अधिक्षक श्री.राजुरकर :-** बजेट तरतुद 5 लाख रुपये आहे. 2017 ला एक लक्ष दिले होते. एक लक्ष प्रस्तावित केले आहे.

**मा. आयुक्त साहेब**: उद्याच देवू.

**मा. महापौर मँडम**: एक लाख बाळाच्या नावावर FD करण्यात येईल व 2 लाख कुटुंबाला देवू.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर** : आठ दिवसापुर्वी सावेडी गावात एका कुटुंबियांच्या मुलीला कुत्र्याने चावा घेतला शहरात कुत्र्यांचे टोळ्के निर्माण झाले आहे.

**मा.श्री.गणेश कवडे :-** हा महत्वाचा प्रश्न आहे. हे काम करणारी संस्था दुर्लक्षपणे काम करत आहे.ते लोक फोन उचलत नाही. सभागृहाला विनंती आहे त्यांचे बील काढू नका बील थांबवा.

**मा.श्री.परसराम गायकवाड :-** कायनेटीक चौकात अशीच घटना घडली हंस यांना फोन केला पण त्यांनी गाडी पाठविली नाही.

**मा.श्री.शाम नळकांडे**:- आतापर्यंत आपण केलेली कागदावर नोंदवलेली कारवाई सांगा.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे** : निर्बीजीकरणासाठी पिंपळगावला सेंटर चालू केले आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे** :- फक्त कान कापले जातात.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** सदर टेंडर रद्द करा नवीन टेंडर काढा.

**मा.श्री.शाम नळकांडे** :- अमरधाम मधील एका प्रेताचा हात व एक अवयव कुत्र्याने बाहेर काढले होते तेव्हा त्या ठीकाणी एक वॉचमन ठेवला.

**मा.श्री.अनिल शिंदे :** ठेकेदाराला कार्यान्वीत आदेश कधी दिला? पिंपळगाव माळवी येथील आतापर्यंत बिलं किती अदा केले?

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे** : ८ - ९ महिन्यापासुन काम करतो. आठशे वर कुत्र्यांचे निर्बिजीकरण झाले आहे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे** :- २९ एप्रिल २०२२ रोजी महानगरपालिकेमध्ये रुजु झालो.पिपल्स फॉर  ॲनिमलचे आठ महिन्याचे काम झाले तर जवळपास पाच लाख बील अदा केले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कमीत कमी 2 वर्षे झाले आहेत त्याला काम देउन कित्येक घटना झालेल्या आहेत. हे बोगस बील आहेत असा माझा आरोप आहे. चुकीचे बील काढले जातात.आयुक्त यांनी गांभीर्याने विचार करा. लेआउटच्या फाईल डायरेक़्ट तुम्ही सही करु नका.मध्ये कोणाची तरी सही ठेवा. आर्थिक वर्ष संपल्यानंतर आर्थिक वर्षातच खर्च झाला पाहीजे. मागील वर्षाचे कामं या वर्षात खतविली जातात. तुम्ही तसे आदेश द्या. निर्बीजीकरणाचे बील अदा किती झाले ते कंन्फर्म सांगु शकत नाही. भाळवणीला कुत्रे  सोडले जातात. ज्या ठिकाणी केंद्र आहे त्या ठिकाणी जायला पाहीजे पण तसे होत नाही. यावर नियंत्रण ठेवा. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना संदर्भात विषय झाला. अमृत भुयारी गटार योजना पूर्ण झाली का?

**शहर अभियंता श्री.इथापे:-** सन  18 मध्ये कार्यारंभ आदेश दिला. दोन वर्ष कोरोना मध्ये कामं संथ गतीने चालु होती.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- जिथे रस्ते खोदले ते सुस्थितीत त्याने दुरुस्त करायला पाहीजे.

**शहर अभियंता श्री.इथापे:-** आतापर्यंत रिस्टोरेशनचे कोणतेही बील दिलेले नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- दोन वेशीत रस्त्याची काय परिस्थीती आहे. भुयारी गटर, फेज 3 ने रस्ते खोदुन ठेवले. आमच्या कडे पैसे, कट करुन घेतेले.५ कोटी त्याला कशाला देतो? अधिकार आपल्याकडे आहे. काम पाहुन घ्या. निकृष्ट दर्जाचे काम चालू आहे. जिथे रस्त्याचे काम केले त्याठिकाणचे रस्त्याची परिस्थिती पहा. मोहरम, गणपती आहे. पॅचींगचे काम पावसात केले ते वाहून गेले. रस्ता पॅचिंगचे काम पावसाळ्यात कसे सुचते? पॅचींग कसे करतात PWD ची पद्धत पहा. त्या ठेकेदाराचे बील अदा करु नये.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे:** ज्या ज्या ठिकाणी अमृत भुयारी गटर योजनेचे सारस नगर भागातील काम केले.. काम केल्यानंतर मी दुरुस्ती करणेबाबत वारंवार निदर्शनास आणुन दिले. पुर्ण काळ्या मातीचा परिसर आहे पण कारवाई होत नाही.त्याचेवर काहीतरी कडक

कारवाई करा. त्याची रक्कम ठेवलेली आहे त्यातुन काम करुन ती बीलातुन कपात करा.

**शहर अभियंता श्री.इथापे:-** १२१ कोटी निविदा १२८ कोटी निविदा आहे. ७५% ते ८०% भौतिक आर्थिक प्रगती ६५% ते ७०% झाली आहे. कलेक्शन सेंटर समाविष्ट भाग १२५ km लांबीची सिस्टिम आहे. १५० -८० ते ९० km काम झाले आहे. परंतु टेक्नीकली काही बाबी येतात. ट्रेंड सोडला जातो दिड दोन फुटाचा क्रॉम्पशन आहे. रिस्टोरेशनचे पैसे आपण त्याला दिलेले नाही ज्या रस्त्यांची दुरावस्था त्या रस्त्यांचे इस्टीमेट करुन घेणे मंजुरीचे काम आमचे नाही. झेंडीगेट परिसर, धरती चौक, प्रभाग क्र.11 काही रस्ता केला. तीन चार रस्त्याला पॅंच देणे हे आम्हाला पटत नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- सुस्थितील रस्ते दुरुस्त करुन घ्यायची जबाबदारी आहे. पैसे जमा होवू द्या. महानगरपालिकेने काम करावे. टेंडर काढून महानगरपालिकेने करावे. महापौरांना विनंती आहे की महानगरपालिकेच्या रोखीचा जो निधी असेल त्यात शहरातील रस्ते करा थोडा आम्हाला निधी कमी घ्या.

**शहर अभियंता श्री.इथापे**:- मुख्य शहरातील रस्ते नवीन करावे लागतील त्यासाठी निधी द्यावा.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा व सर्वसाधारण सभा अनुक्रमे **सोमवार दिनांक ०८-०८-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता व दुपारी २.०० वाजता** पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा व सर्वसाधारण सभा अनुक्रमे **सोमवार दिनांक ०८-०८-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता व दुपारी २.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.महापौर मॅडम, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश.

जा.क्र.नगरसचिव.-
दिनांक : ०१ / ०८ /२०२२

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा व सर्वसाधारण सभा अनुक्रमे **सोमवार दिनांक ०८-०८-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता व दुपारी २.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ४) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ५) | श्रीमती.निकम, नगरसचिव कार्यालय | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी व एक कर्मचारी यांची गणवेशासह नियुक्ती करणेत यावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०९, सोमवार दि. २८/०३/२०२२ रोजीचा अर्थसंकल्पीय सर्वसाधारण होणा-या सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

---*---

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
| --- | --- | --- |
| १ | श्री.गोंटला | |
| २ | श्री.उन्मेश क्षिरसागर | |
| ३ | श्री.बाळासाहेब साळवे | |
| ४ | श्री. | |

कार्यालयीन आदेश.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव.-
दिनांक :- ०२/०८/२०२२.

प्रति,

१) श्री.दयानंद साळवे, विरोधी पक्ष नेता
२) श्री.राउत , सामान्य प्रशासन विभाग,
३) श्री. शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
४) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय
५) श्री.आकाश घुले, सभागृह नेता कार्यालय,
६) श्री.बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय,
७) श्री.राजु दळवी, उपायुक्त कार्यालय,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा व सर्वसाधारण सभा अनुक्रमे **सोमवार दिनांक ०८-०८-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता व दुपारी २.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपण सकाळी ९.३० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक : ११/०४/२०२२.

विषय : मंगळवार दिनांक - २९ / ०३ /२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०९ चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९७६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २८/०३/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे. सदर सभेमध्ये मा.सभापती, स्थायी समितीने, मा.महापौर साहेब यांचेकडेस सादर केला व सदरहु अर्थसंकल्पीय सभा दिनांक २९/०३/२०२२ रोजी घेण्यांत आली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.१५,०५०/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार पन्नास फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या* **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **२ व ३ ची बेरीज** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रति,
मा.जिल्हा सरकारी वकील,
जिल्हा न्यायालय,
अहमदनगर.

विषय :- मा.दिवाणी न्यायालय, अहमदनगर येथील दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.९६/२०२१

श्री.श्रीपाद छिंदम विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर.

संदर्भ :- १) अमपा-२०१८/प्र.क्र.१०४/नवि-२५ दिनांक २२/०३/२०२१ मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र.
२) कोर्ट विभाग जा.क्र. १९६ दिनांक २४/०३/२०२१.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यांत येते की, विषयांकित अर्जामध्ये शासनाच्या वतीने मा.दिवाणी न्यायालय, अहमदनगर येथे जबाब दाखल करण्यासाठी मला प्राधिकृत करण्यांत आले आहे.

तरी विषयांकित प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने सरकारी वकील यांची नियुक्ती करुन कामकाज पाहण्याचे करावे हि विनंती.

सोबत :- वकील पत्र.

आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप :-** १) प्रत्येक सदस्याने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरुन AMC Corporator official What's App मध्ये निर्देश दिल्यानुसार ॲप डाउन लोड करुन घेणे.
२) वरिलप्रमाणे ॲप व्दारे प्रत्येक सदस्यांना मा.महासभेस उपस्थित राहता येईल.
३) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये व दिनांक ०९ सप्टेंबर २०२० च्या पत्रान्वये कळविले नुसार सदरची सभा ऑनलाईन ॲप व्दारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा. सदस्यांनी महानगरपालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

शहरातील नागरिकांना जन्म-मृत्यूचे दाखले व विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळणेकामी व प्रलंबित अर्जांचा जलद गतीने निपटारा होण्यासाठी प्रभाग निहाय 1) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रमांक 1 सावेडी, 2) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रमांक 2 शहर, 3) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रमांक 3 झेंडीगेट, 4) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रमांक 4 बुरुडगांव यांची जन्म-मृत्यूचे दाखले व विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणेकामी उपनिबंधक म्हणुन नेमणूक करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सूचक :
अनुमोदक :

ठराव सर्वानुमाने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.